। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २६६ वा । मंगळवार दिनांक ०६ जानेवारी, २०२६ । पृष्ठ ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### एकाचा मृत्यू तर दुसरे गंभीर जखमी

लोहारा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत गणेश नामदेव डोंगरे, वय ३२ वर्षे, व सोबत बाबा नवनाथ नागरगोजे रा. डोंगरेवाडी ता. वडवणी जि. बीड हे दि.०३.०१.२०२६ रोजी महिंद्रा कंपनीचे मिनी ट्रॅक्टर या वरुन जात होते. दरम्यान भाउसाहेब बिराजदार साखर कारखाना समुद्राळ येथे महिंद्रा अर्जुन ट्रॅक्टरचा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा चालवून गणेश डोंगरे यांचे मिनी ट्रॅक्टरला धडक दिली. या अपघातात गणेश डोंगरे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर बाबा नवनाथ नागरगोजे हे जखमी झाले. फिर्यादी भरत अश्रुबा डोंगरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य- जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



धाराशिव, (जिमाका)- नॅचरल उद्योग समूहाच्या वतीने ऊस उत्पादन वाढीसाठी विकसित करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence AAI) आधारित तंत्रज्ञान प्रकल्पाचा भव्य शुभारंभ नॅचरल शुगर अलाईड इंडस्ट्री,रांजणी (ता. कळंब) येथे पार पडला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नॅचरल उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री.ठोंबरे, विविध साखर कारखान्यांचे चेअरमन,कार्यकारी संचालक, सरव्यवस्थापक,संचालक मंडळ, प्रवर्तक,शेतकरी सभासद तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य असल्याचे नमूद केले. नॅचरल उद्योग समूहाने एआय तंत्रज्ञानाचा अवलंब करून घेतलेली ही पुढाकारात्मक सुरूवात अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच भविष्यात जिल्ह्यातील ऊस उत्पादनासोबतच इतर पिकांमध्येही एआय तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर कसा करता येईल,यासाठी नॅचरल उद्योग समूहासोबत समन्वयाने प्रयत्न केले जातील,अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन मिळणार असून,शेती अधिक शाश्वत, नफा देणारी व आधुनिक करण्यास या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## लोकशाही दिनातून नागरिकांच्या तक्रारीची दखल चार तक्रारी दाखल,मागील सर्व तक्रारी निकाली



धाराशिव (जिमाका) नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी राबविण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन धाराशिव येथे आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.या वेळी अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती. शफकत आमना,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) संतोष राऊत तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या लोकशाही दिनात एकूण चार तक्रारी प्राप्त झाल्या.त्यामध्ये उपविभागीय अधिकारी धाराशिव यांच्याकडे दोन,भूमी अभिलेख विभागाकडे एक व उपनिबंधक धाराशिव यांच्याकडे एक तक्रार दाखल करण्यात आली. विशेष बाब म्हणजे यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा निपटारा प्रशासनाने वेळेत केला आहे.

लोकशाही दिन हा नागरिक व प्रशासन यांच्यातील थेट संवादाचा प्रभावी मंच असून सामान्य नागरिकांना आपली समस्या थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत मांडण्याची संधी मिळते.यामुळे प्रशासकीय विलंब कमी होतो,पारदर्शकता वाढते आणि नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास दृढ होतो.लोकशाही दिनामुळे न्याय सुलभ,जलद व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतो.

नागरिकांनी लोकशाही दिनाचा लाभ घेऊन आपल्या समस्या मांडाव्यात व त्याची सोडवणूक करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## शेतकऱ्याची चोरीस गेलेली म्हैस स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव ने केली परत

धाराशिव (प्रतिनिधी)-रोजी शेतकरी नामे सूर्यकांत धोंडीराम धाकतोडे यांच्या शेतातून त्यांची दहा महिन्याची गाभण मुऱ्हा जातीची ०१,४०,००० रु किमतीची म्हैस चोरी गेली होती. सदर बाबत पोस्टे शिराढोण गु.र.नं. ०२/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. दिनांक ०४.०१.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे गस्त करीत पोस्टे शिराढोण हद्दीत आले असता धाबा पाटी, शिराढोण पारधीपेढी जवळ एक म्हैस व एक रेडकु रात्रीच्या अंधारात घेऊन जाताना दिसून आला. सदर बाबत संशय अल्याने त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे अधिक चौकशी करण्याकरिता नमूद इसम व जनावरांना पोलीस ठाणे शिराढोण येथे नेऊन चौकशी केली असता सदरची म्हैस ही पोस्टे शिराढोण चोरीस गेलेली म्हैस असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी पंचनामा करून सदरची म्हैस व रेडकू कि. ०१,४०,००० रु. जप्त करून आरोपी नामे जालिंदर उर्फ पिंटू शंकर शिंदे, रा. ब्रह्मगाव, शेंडी पाटी, वाशी जि धाराशिव याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे दोन साथीधारासह सदर म्हैस चोरली असल्याची कबुली दिली त्यास पुढील कारवाई कामी पोलीस ठाणे शिराढोण यांच्या ताब्यात दिलेले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली पोनि विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, पोह/१२७५ फरहान पठाण, चापोह/५३९ रत्नदीप डोंगरे, चापोह६६२ नवनाथ गुरव यांनी केली आहे.

## तुळजापूर येथे जुने बसस्थानकातून पाकिट मारले

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सोमनाथ बापुराव झेंडेकर, रा. प्लॉट नं २२६ बीड बायपास नाईकनगर जि. संभाजीनगर हे ०४.०१.२०२६ रोजी जुने बसस्थानक तुळजापूर येथे सोलापूर धुळे बसमध्ये चढत असताना अरुण रा. मिलींद नगर भुतारा रोड जामखेड जि. अहिल्यानगर यांनी गर्दीचा फायदा घेवून सोमनाथ झेंडेकर यांचे पॅन्टच्या मागच्या खिशातील ६,५७० चोरण्याचा पृयत्न केला आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी सोमनाथ झेंडेकर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२),६२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा-२ दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी अनुदान व आधुनिक सुविधा

धाराशिव (जिमाका) राज्यातील दुध उत्पादन वाढवणे, पशुपालकांचे उत्पन्न वाढवणे आणि दुग्ध व्यवसाय अधिक आधुनिक व शाश्वत बनवण्याच्या उद्देशाने विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा-२ राबविण्यात येत आहे.या प्रकल्पाअंतर्गत दुध उत्पादक शेतकरी व पशुपालकांसाठी विविध घटकांवर अनुदान व सुविधा देण्यात येणार आहेत.

या प्रकल्पात उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गायी-म्हशींचे वाटप,गर्भ प्रत्यारोपणाद्वारे तयार केलेल्या गाभण कालवडींचे वाटप, पशुप्रजनन पूरक खाद्य, दुधातील फॅट व एसएनएफ वाढवणारे खाद्यपूरक, बहुवर्षीय चारा पिकांचे बियाणे, विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्र,मुरघास (सायलेज),वंधत्व निवारण उपचार तसेच शेतकऱ्यांना प्रशिक्षण अशा अनेक घटकांचा समावेश आहे.

उच्च दूध उत्पादनक्षम जनावरांसाठी ५० टक्के अनुदान (कमाल ५० हजार रुपये),तर गर्भ प्रत्यारोपणाद्वारे तयार केलेल्या दोन गाभण कालवडींसाठी सुमारे ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. पशुखाद्य व फॅट-एसएनएफ वाढवणाऱ्या खाद्यपूरकांवर २५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे.बहुवर्षीय चारा पिकांच्या बियाण्यावर १०० टक्के अनुदान,तर कडबाकुट्टी यंत्रावर ५० टक्के (कमाल १५ हजार रुपये) अनुदान मिळणार आहे.वंधत्व निवारण उपचार व प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहेत.

या योजनेसाठी पात्र ठरण्यासाठी पशुपालकाकडे किमान दुधाळ जनावरे,दूध संकलन केंद्रावर दूध विक्री,शास्त्रोक्त पशुपालन पद्धतीचे ज्ञान व कृत्रिम रेतनास सहमती अशा अटी आहेत.प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून www.vmddp.com या पोर्टलवर वर्षभर,२४ तास मोफत अर्ज करता येणार आहे.अर्जासाठी आधारकार्ड, राशनकार्ड मोबाईल क्रमांक,७/१२ उतारा, कुटुंबातील इतर सदस्यांचे आधारकार्ड क्रमांक,बँक पासबुक, जनावरांचे बिल्ला क्रमांक इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत.एका कुटुंबातील फक्त एका व्यक्तीस लाभ दिला जाणार आहे.

हा प्रकल्प दुग्ध व्यवसायाला नवी दिशा देणारा ठरेल व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल,असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## कागदावर नाही, गावात उतरून विकास अर्चनाताई पाटील यांची वेगळीच कार्यशैली

धाराशिव( रामेश्वर डोंगरे) जिल्हा परिषद निवडणूक जशी जवळ येत आहे तसे तसे राजकीय वातावरण तापू लागले आहे मात्र या स्पर्धेत एक नाव वेगळ्या पद्धतीने चर्चेत आहे सौ.अर्चनाताई पाटील केवळ भाषणावर किंवा आश्वसनावर विश्वास न ठेवता काम शिस्त आणि प्रत्यक्ष उपस्थिती या त्री सूत्रीवर विश्वास ठेवणाऱ्या अर्चनाताईंनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीनिशी तयारी सुरू केली आहे अर्चनाताईची कार्यपद्धती इतरांपेक्षा वेगळी आहे कोणतेही काम असो, पाणीपुरवठा, रस्ता, आरोग्य शाळा अंगणवाडी किंवा महिलांचे प्रश्न ते काम प्रथम त्यांच्या डायरीत नोंदले जाते. त्यानंतर संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला जातो आणि काम पूर्ण होईपर्यंत त्या थांबत नाहीत. विशेष म्हणजे काम पूर्ण झाल्यावर त्या स्वतः त्या गावात जाऊन कार्यकर्त्यासमोर आणि ग्रामस्थ समोर



उभा राहून कामाचा आढावा घेतात आज अर्चनाताई पाटील तळागाळात जाऊन ग्रामीण कार्यकर्त्याची मजबूत साखळी उभा करीत आहेत बूथ निहाय कार्यकर्ता महिलाचे सोयी सहाय्यता गट युवकाची फळी आणि जेष्ठाचा सन्मान या साऱ्यांना सोबत घेत त्यांनी जिल्हाभर विश्वासाचे जाळे निर्माण केले आहे. त्यामुळे त्यांची ओळख आता केवळ नेत्या म्हणून नाही तर काम पूर्ण करून दाखवणारी नेता अशी होत आहे यापूर्वीही सामाजिक उपक्रम महिला सक्षमीकरण युवकांना रोजगाराची संधी शासकीय योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे यामध्ये अर्चनाताईंनी ठोस काम केले आहे त्यांच्या या कार्यशैलीमुळे विरोधकांमध्ये अस्वस्थता तर कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळतो, जिल्हा परिषद निवडणूक ही केवळ राजकीय लढत नसून विकास विश्वास आणि कामाच्या पारदर्शकतेची परीक्षा आहे आणि या परीक्षेत अर्चनाताई पाटील यांनी आपल्या कामाच्या जोरावर आधीच आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे तरी या जिल्हा परिषदेत निवडणुकीमध्ये विरोधकाला घाम येणार हे नक्कीच.




ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वेगवान प्रसारमाध्यमे बनली

वेगवान प्रसारमाध्यामुळे, माध्यमात प्रगती झाल्याचे स्पष्ट जाणवत आहे. पुर्वी एकमेकास संदेश देणे अवघड होते. अनेक काळ व वेळ लागत होता. बराच काळ पोष्टाच्या पत्राने घेतला. सुरवातील मुद्रण काळ उदयास आला. प्रिटींग प्रेस निघाली. ही भारतीय कला नव्हती तर परदेशातील ही कला भारतीयांनी आवगत करून यात प्रगती केली. खिळ्याची जोडवणुक करून प्रिंटींग होवू लागले. यासाठी फौंड्री निर्माण झाल्या त्याही आता कालाबाह्य झाल्या आहे. वाढत्या संगणीकरणामुळे जग जवळ आले. टीव्ही बरोबर मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर वाढल्याने जगच घरात आल्यासारखे झाले. अमेरिकेत काय घडले किंवा ट्रम्प यांनी कोणती कारवाई केली ही क्षणात सचित्र दिसू लागले. माहिती मिळण्यासाठी अनेक स्त्रोत निर्माण झाले. विविध चॅनल्सद्वारे चोवीस तास बातम्या घर बसल्या कळू लागल्या. असे असताना देखिल मुद्रित वृत्तपत्राचे महत्त्व कमी झाले नाही तर उलट विश्वार्हतेत वाढ झाली. कोणत्याही वृत्तपत्राचे वाचक कमी झाले नाहीत तर उलट वाढ झाली आहे. प्रिंट मिडीयावरील विश्वास कमी झाला असे केवळ बोलले जाते प्रत्यक्षात मात्र विविध माहितीच्या चॅनल्स एकले तरी सकाळी उठल्या बरोबर वृत्तपत्र वाचल्याशिवाय दिवसाची सुरवात न करणारे मंडळी असंख्य आहेत. त्यामुळे प्रिंट मिडीयाने जो विश्वास संपादन केला आहे तो टिकवुन आहे हे लक्षात येते. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पन नावाचे पहिले मुद्रित वृत्तपत्र सुरू केले तेंव्हा पासुन प्रिंट मिडीया टिकून आहे हे लक्षात येते. चॅनल्सवर बोलल्याचा ईन्कार केला जावु शकतो मात्र तसे प्रिंट मिडीयात होत नाही. सत्य जे आहे तेच छापावे लागते. जे जनतेला योग्य आहे तेच मुद्रीत करावे लागते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात आता दिर्घ काळ प्रिंट मिडीया चालविणे आवघड होत आहे. एकतर हा व्यवसाय अतिश्रीमंताचा बनला आहे. भांडवलदाराचा बनला आहे. त्यामुळे लहान व मध्यम वृत्तपत्रे स्पर्धेच्या युगात टिकणे आवघड आहे. वरचेवर शासनाचे जाचक नियम लावले जात आहेत. त्यामुळे आगामी काळात प्रिंट मिडीयाचे आस्तित्व धोक्यात येवुन ते कालांतराने बंद पडणार आहे असे चित्र सध्याला दिसून येत आहे. बोलणे सोपे आहे मात्र, वृत्तपत्र या स्पर्धेच्या युगात चालविणे आवघड आहे. त्यामुळे एक दिवस असा येईल की, वृत्तपत्र चालविण्यापेक्षा गप्प राहाणे बरे. असे झाले तरी लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ कमकुवत होईल. हाळू-हाळू अस्तित्व लयास जाईल. वृत्तपत्राच्या आडीआडचणीकडे कोणाचेही लक्ष नाही. आर्थिक संकट मोठे उभा राहात आहेत. प्रिंट मिडियाला राज्य सरकारने मदत केली पाहिजे, मात्र राज्यातील वृत्तपत्राचे जाहीरात दरात वाढ केली नाही. त्यांचे अनेक प्रश्न आहेत. सर्वात दुर्दैव बाब दिर्घ जीवन संपादक जगू शकत नाहीत. या क्षेत्रात आल्याने आयुष्य कमी होत आहे. अल्पावधित जीवन संपले जात आहेत. विविध रोगाने त्रस्त होत आहेत. त्यामुळे केवळ लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ वरचेवर अतिकमकुवत होत आहे. त्यामुळे तातडीने राज्य सरकारने लक्ष देवुन जाहिरात दरात शंभर टक्के वाढ केली पाहिजे. केंद्र शासनाने जाहिरात दरात वाढ केली आहे. तशीच राज्य शासनाने करणे अपेक्षित आहे. शेजारील कर्नाटक सरकार हे वृत्तपत्र जगली पाहिजे. टिकली पाहिजेत म्हणून सर्वांना पुर्ण पानाच्या सतत जाहिराती देत आहे. महाराष्ट्रात महायुतीचा सुरवातीच्या दुसऱ्या टर्म मध्ये सर्वांच्या हिताचे निर्णय घेतले मात्र वृत्तपत्रासंबंधीचा एकही निर्णय घेतला गेला नाही. पत्रकारला देण्यात येणारी पेंन्शन बाबत जाचक अटी शितील करणे आवश्यक आहेत तरच गरजू पत्रकार या योजनेत बसतील. आरोग्य सुविधा बाबत जी योजना पत्रकारासाठी आहे. त्यातही सुधारणा होणे अपेक्षित आहे. पत्रकार दिन हा सार्थक साजरा झाला पाहिजे. आजही जेष्ठ पत्रकार आहेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत. ज्या पत्रकारांना अखंड अशी पंचवीस ते तीस वर्षापासून शासनाची अधिस्विकृतीपत्रिका आहे अशांचा शासनाने गौरव करून त्यांना कोणतेही अट न घालता पेन्शन चालू केली पाहिजे. जे घेणार नाही ज्यांना नको, अशांना सोडून दयावे, ज्यांना गरज आहे अशांना पेंशन चालू करणे आवश्यक आहे. प्रिट मिडीयाने बातम्याची विश्वार्हता टिकवुन ठेवली आहे. त्यामुळे कोरडे कौतुकापेक्षा भरीव काही मदत करता येईल का? याचा विचार केला पाहिजे. मुळात वृत्रपत्रक्षेत्रात एकतर जीवघेणे स्पर्धासुरू आहे. यातून टिकणे अग्निदिव्य आहे. शासनाच्या मदतीशिवाय जगणे अशक्य आहे. त्यामुळे पत्रकार दिनी प्रिंट मिडीयाचा विचार करून काही सहकार्याची घोषणा होणे अपेक्षित आहे. एकतर मुद्रण क्षेत्रात खर्चिक बाबी वाढत आहेत. वास्तविक छोटे व मध्यम वृत्तपत्रे शासनाचे खरे मदतगार आहेत. ग्रामीण भागातील वृत्तपत्रे खऱ्या अर्थाने शासकिय योजनेस प्रसिद्धी देतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे पत्रकार दिनी पत्रकारासाठी उपयुक्त असे नियोजन होणे अपेक्षित आहे. केवळ स्त्युती करून आता चालणार नाही. पत्रकार दिन सार्थक करण्यासाठी पत्रकारांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. पत्रकारांच्या समस्या फार काही नाहीत. राज्य सरकारने एकतर पेंशनबाबत नियम शितील केले पाहिजेत. दुसरे असे की, पंचवीसवर्ष अधिस्विकृती आहे अशांना फुल नाही फुलाची पाकळी म्हणून पेंशन चालू केली पाहिजे. तसे पाहिले तर न मागता लाडक्या बहिणीला मदत दिली जाते. तसेच न मागता पंचवीसवर्ष अखंड सेवा करणाऱ्या अधिस्विकृतीपत्रकारांना पेन्शन पत्रकार दिनापासून चालू करावी. महागाईच्या निर्देशानुसार जाहिरात दरात वाढ केली पाहिजे. सध्याच्या जाहिरात दरात शंभरटक्के वाढ करणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्याचे शासनाचे सर्वाकडे लक्ष आहे. त्यानुसार पत्रकारांच्या समस्याकडे लक्ष देवून समस्या सोडविणे हे पत्रकार दिनी औचित्याचे आहे. पत्रकार दिनी केवळ पत्रकारांची प्रशांस किंवा स्त्युती करून चालणार नाही. अशांनी वृत्तपत्र चालत नाही. या क्षेत्रात जीवघेणे स्पर्धा निर्माण झाली आहे यावर मात सरकारची मदत आवश्यक आहे. त्यामुळे पत्रकारांच्या समस्या या पत्रकार दिनी सोडविणे आवश्यक आहे.

# पत्रकार दिन.....

मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र आज म्हणजेच ६ जानेवारी रोजी सुरु केले. याच कारणामुळे आजचा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जांभेकर यांचे स्मरण करुन त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनाविषयी आपण थोडे जाणून घेऊया

ब्रिटिश सत्तेत असताना त्यांच्या विरोधात लिखाण करण्यास मनाई होती

बाळशास्त्री जांभेकर हे मुळात अतिशय कुशाग्र, उच्च गुणवत्ता असलेलं व्यक्तिमत्त्व होतं. ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले होते. त्यानंतर २९ जानेवारी १७८० रोजी पश्चिम बंगालमध्ये 'बेंगॉल गॅझेट' नावाचे साप्ताहिक सुरु करण्यात आले. आपले विचार प्रभाविपणे मांडण्यासाठी वृत्तपत्र हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे, याची जाणीव हळूहळू भारतीयांना होऊ सागली. त्यानंतर बेंगॉल गॅझेटच्या अर्ध्या दशकाने म्हणजेच ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. जांभेकर यांना आपण दर्पणकार म्हणून ओळखतो. ब्रिटिश कालखंडात इंग्रजांच्या विरोधात लिखाण



करण्यास मनाई होती. असा परिस्थितीतही जांभेकर यांनी दर्पणच्या संपादकपदाची धुरा समर्थपणे सांभाळली होती.

**दर्पणमध्ये नेमकं काय असायचं ?**

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला होता. त्यावेळी हा अंक मराठी तसेच इंग्रजी अशा दोन्ही भाषेत म्हणजेच जोडभाषेत प्रकाशित केला जायचा. एक इंग्रजी आणि एक मराठी असे दोन स्तंभ या वृत्तपत्रात असत. मराठी जनतेला देशात काय सुरु आहे हे समजावे म्हणून स्तंभ मराठीत लिहिला जायचा. तर वृत्तपत्रात काय लिहिले आहे हे ब्रिटिशांना समजावे म्हणून दुसरा स्तंभ इंग्रजीत लिहला जायचा. इंग्रजी सत्तेचे कायम लक्ष असूनही तब्बल साडे आठ वर्षे दर्पण हे वृत्तपत्र चालले. त्याचा शेवटचा अंक जुलै १८४० मध्ये प्रकाशित झाला.

**बाळशास्त्री जांभेकर बहुआयामी, बहुभाषिक आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व**

बाळशास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्राला पहिले वृत्तपत्र देऊन वैचारिक अभिसरणाची पेरणी केली. त्यांच्यानंतर वृत्तपत्र हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे साधन बनले. जांभेकर हे एक अतिशय हुशार आणि बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांना संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी या भाषा चांगल्या अवगत होत्या. शिवाय ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, बंगाली आणि गुजराती या भाषांवरही त्यांचे प्रभुत्त्व होते. भूगोल, विज्ञान, गणित अशा विषयात ते पारंगत होते. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले ते पहिले भारतीय आहेत. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाल प्रणाम आणि सर्वांना पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

# दर्पणकारांचे पत्रकारितेतील योगदान आणि आजच्या पत्रकारांची नैतिक जबाबदारी



६ जानेवारी राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी सन १८३२ मध्ये दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजाला दिशा देणे, सत्याचा शोध घेणे आणि समाजहितासाठी आवाज उठवणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर दर्पणकार आचार्य जांभेकरांचे पत्रकारितेमधील योगदान आणि आजच्या पत्रकारांनी पाळावयाची नैतिकता यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

**बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील महत्त्व:**

मराठी पत्रकारितेची सुरुवात: ६ जानेवारी १८३२ मध्ये त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राने समाजजागृतीचे कार्य केले. दर्पण'च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. 'दर्पण'ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुतींविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी 'दिग्दर्शन' हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना 'दर्पणकार' म्हणून संबोधले जाते.

जांभेकरांनी पत्रकारितेद्वारे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध त्यांनी लेखन केले. ब्रिटिश काळात त्यांनी लोकांना स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची जाणीव करून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना जागृत केली. पत्रकारितेला त्यांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांच्या लेखनात सत्य, विवेक आणि समाजहित यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांना मराठी पत्रकारितेचे जनक ही उपाधी मिळाली.

**आजच्या पत्रकारांनी घ्यावयाची काळजी:-**

आजच्या काळात पत्रकारिता अधिक व्यापक झाली आहे. छापील माध्यमांबरोबरच दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल पोर्टल्स आणि सोशल मीडिया ही नवे माध्यमे उपलब्ध झाली आहेत. या बदलत्या परिस्थितीत पत्रकारांनी काही बाबींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे:

सत्यता आणि पडताळणी: बातमी देताना तथ्यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. अप्रमाणित माहिती किंवा अफवा पसरवणे टाळावे.

**निष्पक्षता:** कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता निष्पक्ष वृत्तांकन करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे.

लोकहिताचा विचार: बातमी ही केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी नसून समाजहितासाठी असावी.

**भाषेची शुद्धता:** पत्रकारितेत वापरली जाणारी भाषा स्पष्ट, सोपी आणि शुद्ध असावी. चुकीची भाषा जनमानसात गोंधळ निर्माण करू शकते.

**गोपनीयतेचा आदर:** व्यक्तीगत गोपनीयता आणि संवेदनशील माहिती यांचा आदर राखणे आवश्यक आहे.

**नवमाध्यमांचा जबाबदार वापर:** सोशल मीडिया हे प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा वापर करताना नैतिकता आणि जबाबदारी पाळणे गरजेचे आहे.

**पत्रकारितेतील नैतिकता:**

पत्रकारितेची नैतिकता ही तिच्या विश्वासार्हतेचा पाया आहे.

**सत्यनिष्ठा:** पत्रकाराने सत्याला प्राधान्य द्यावे.

**स्वतंत्रता:** कोणत्याही दबावाखाली न येता स्वतंत्रपणे बातमी देणे.

**उत्तरदायित्व:** समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कार्य करणे.

संवेदनशीलता: सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक बाबींमध्ये संवेदनशीलता राखणे.

लोकशाही मूल्यांचे संरक्षण: पत्रकारितेने लोकशाही मजबूत करावी, जनतेला माहितीपूर्ण करावे.


आजचा पत्रकार दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारधारेला आधुनिक पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात महत्त्व आहे. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेत एक नैतिक आधार तयार झाला, जो आजही पत्रकारितेचा आधारभूत आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेतील वारसा आणि कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी पत्रकारितेला समाजजागृतीचे साधन बनवले. आजच्या पत्रकारांनी त्यांच्या आदर्शांचा विचार करून सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि समाजहित यांचा आग्रह धरावा. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हा स्तंभ मजबूत राहणे, हे पत्रकारांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे.

**सुनील सोनटक्के,**
जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

# स्त्री वादाला सुरुवात करणारी लेखिका मुक्ता साळवे

खऱ्या अर्थाने मुक्ता साळवे या दलित स्त्रीवादी साहित्याचा पाया घालणाऱ्या पहिल्या लेखिका म्हणून ओळखल्या जातात. मुक्ता साळवे यांनी बहुजन समाजाच्या दुःखा विषयी एक निबंध लिहून मोठी चळवळ सुरू केल्याचे दिसून येते. ज्ञानोदय मासिका मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी मांग महार यांच्या दुःखाविषयी या शीर्षकाचा निबंध लिहून प्रकाशित केला. ज्ञानोदय मासिकाने या निबंधाची दखल घेऊन त्याला प्रसिद्ध दिली.या निबंधाच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या दुःखाविषयी पहिली विचारणा मुक्ता साळवे यांनी ब्रिटिश सरकारला केल्याचे दिसून येते.या निबंधाच्या माध्यमातून समाजातील विषमता आणि अस्पृश्यतेवर आवाज उठवल्याचे आपल्याला दिसून येते. क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांनी सुरू केलेल्या शाळेतील पहिली विद्यार्थिनी म्हणजे मुक्ता साळवे होय. मुक्ता साळवे या आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतणी होत्या. क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांनी स्वतःची पुतणी ज्योतिबा फुले यांच्या शाळेत दाखल करून फुले यांना सर्व प्रकारचे संरक्षण पुरवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

मुक्ता साळवे यांचा जन्म ५ जानेवारी



१८४० साली पुण्यात झाला. १८४८ साली ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली ,त्या शाळेतील पहिली विद्यार्थिनी ही मुक्ता साळवे होत्या.

मुक्ता साळवे यांनी केवळ निबंध लिहून मांग आणि महारा विषयीच्या वेदना समोर आणल्या नाहीत तर त्यांनी स्त्री चळवळीसाठी देखील महत्त्वपूर्ण कार्य केले.

मुक्ता साळवे यांनी लिहिलेल्या निबंधातील मुद्दे आजही विचार करायला भाग पाडतात. त्या काळात इतर जातींनी वेद वाचू नयेत , असे म्हटले जात होते. याचा अर्थ आम्हास धर्म पुस्तक नाही.तेव्हा मुक्ता साळवे म्हणतात की, नेमका आमचा धर्म कोणता आहे? असा ठणकावून सवाल त्यांनी आपल्या निबंधात विचारला. मुक्ता साळवे पुढे म्हणाल्या की, शिक्षणामुळे आपली गुलामी कमी होते.ज्ञानरूपी औषध घेतल्यामुळे दारिद्र्यरुपी रोग बरा होतो.

दलित समाजाच्या जातीवरील गुन्हेगारीच्या शिक्याविषयी बोलणाऱ्या मुक्ता साळवे या पहिल्या स्त्री आहेत. स्त्रियांच्या दुःखाबद्दल लिहीत असताना त्यांनी स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुःख किती भयंकर असते? याचे विदारक वास्तव वर्णन त्यांनी त्यांच्या लेखनामध्ये केलेले आहे.



प्रा.हरी नरके यांच्या शब्दात त्यांनी मुक्ता साळवे यांचा उल्लेख आद्य दलित लेखिका असा केला आहे. आज मुक्ता साळवे यांची जयंती आहे.जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.!

**प्रा. डॉ.मारुती अभिमान लोंढे**
(अर्थशास्त्र विभागप्रमुख, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,धाराशिव)

## नसांमध्ये जमा झालेला घाणेरडा कोलेस्ट्रॉल कमी करतील हे ५ फायबर फूड्स

आजच्या जीवनशैलीत चांगले आरोग्य राखणे हे मोठे आव्हान आहे. दररोज आपण काही खाद्यपदार्थ खात असतो ज्यामुळे आपल्या आरोग्याला हानी पोहोचते. तसेच, ज्यांना उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि हृदयाशी संबंधित आजार आहेत, त्यांच्यासाठी जास्त तेल आणि फास्ट फूड असलेले पदार्थ खूप हानिकारक आहेत. उच्च कोलेस्ट्रॉलच्या रुग्णांसाठी, त्यांच्या आहारात उच्च फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करणे खूप फायदेशीर ठरू शकते. फायबर युक्त आहार केवळ कोलेस्ट्रलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करत नाही तर हृदयविकाराचा धोका देखील कमी करतो. उच्च फायबरयुक्त आहार कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. तुमच्या दैनंदिन आहारात या पदार्थांचा समावेश केल्याने केवळ कोलेस्ट्रॉल कमी होत नाही तर एकूणच आरोग्यही सुधारते. येथे काही उच्च फायबर पदार्थ आहेत, जे उच्च कोलेस्ट्रॉल रुग्ण त्यांच्या आहारात समाविष्ट करू शकतात.

ओट्स

कोलेस्ट्रॉलच्या रुग्णांसाठी कला फायदेशीर आहे. ओट्समध्ये बीटा-ग्लुकन नावाचे विरघळणारे फायबर असते, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. त्यामुळे रोजच्या आहारात ओट्सचे सेवन करा. ओट्स दलिया बनवून किंवा स्मूदी बनवून तुम्ही न्याहारीमध्ये त्यांचे सेवन करू शकता.

शेंगा

कडधान्ये, हरभरा, राजमा इत्यादी शेंगांमध्ये जास्त प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते. तथापि, आपण ते केवळ एका विशिष्ट प्रमाणात सेवन करावे अन्यथा ते आपले नुकसान करू शकते. तुम्ही ही बीन्स सॅलड, सूप किंवा करीमध्ये घालून सेवन करू शकता.

फळे

योग्य प्रमाणात फायबर मिळविण्यासाठी, फळे सर्वात महत्वाची आहेत. हे महत्वाचे आहे की, तुम्ही त्यांचे सेवन फक्त सालांसोबत करा. सफरचंद, नाशपाती, संत्रा आणि बेरी यांसारख्या फळांमध्ये पेक्टिन नावाचे विरघळणारे फायबर असते. जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. तुम्ही ते स्नॅक म्हणून खाऊ शकता किंवा सॅलडमध्ये मिसळून खाऊ शकता पण ते नक्की खा.

सुकी फळे आणि बिया

बदाम, अक्रोड, चिया बिया आणि फ्लेक्ससीड्समध्ये फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड जास्त प्रमाणात असते, जे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. हे तुमच्या आरोग्यासाठी फायबरसह आवश्यक पोषक तत्वे प्रदान करते. म्हणून, आपण आपल्या दैनंदिन दिनचर्यामध्ये ते समाविष्ट केले पाहिजे. तुम्ही ते स्नॅक म्हणून किंवा दही, सॅलड आणि स्मूदीमध्ये मिसळून खाऊ शकता.

धान्य

संपूर्ण धान्य खाणे हा फायबर मिळविण्याचा सर्वात सोपा आणि उत्तम मार्ग आहे. तपकिरी तांदूळ, क्विनोआ आणि संपूर्ण धान्य ब्रेडमध्ये जास्त प्रमाणात फायबर असते, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. तुम्ही ते मुख्य जेवण किंवा साइड डिश म्हणून घेऊ शकता. त्यामुळे कोलेस्ट्रॉलच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी या गोष्टींचे सेवन अवश्य करावे जेणेकरुन त्यांना लवकरात लवकर कोलेस्ट्रॉलच्या समस्येपासून मुक्तता मिळेल.

## मुलांना लहान वयातच शिकवा या ४ गोष्टी, भविष्यात कधीच मूल मागे पडणार नाही



पालकत्व हे सर्वात कठीण कामांपैकी एक आहे. त्यांच्याकडे अनेक जबाबदाऱ्या तसेच खूप दबाव येतो. प्रत्येक पालकाचे स्वप्न असते की आपल्या मुलाने चांगला माणूस व्हावा आणि यश मिळवावे. कोणत्याही मुलाला यशस्वी होण्यासाठी त्याच्या पालकांकडून चांगले संस्कार मिळणे अत्यंत आवश्यक असते. मुलाने कितीही मोठ्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठात आपले शिक्षण पूर्ण केले तरी त्याला त्याच्या पालकांकडून चांगले संस्कार मिळाल्याशिवाय तो यशस्वी होऊ शकत नाही. आजकाल सर्वत्र वाईट गोष्टींचा प्रसार झपाट्याने होत आहे आणि त्यामुळेच मुलाला चांगला माणूस बनवायचा असेल तर त्याला लहानपणापासूनच काही गोष्टी शिकवायला हव्यात. ज्या तुम्ही तुमच्या मुलाला चांगल्या आणि उज्ज्वल भविष्यासाठी लहानपणापासूनच शिकवल्या पाहिजेत.

प्रत्येकासाठी आदर

लहान असो वा मोठा प्रत्येकाचा आदर करणे खूप महत्वाचे आहे आणि हे मुलांना लहानपणापासूनच शिकवले पाहिजे. आपल्या मुलाला हे समजणे खूप महत्वाचे आहे की त्याने या गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे आणि लहान-मोठ्या प्रत्येकाचा आदर केला पाहिजे. लहानपणापासून जेव्हा तुम्ही तुमच्या मुलाला या गोष्टी शिकवता तेव्हा त्याला या गोष्टी लवकर कळतात.

खोटे बोलू नका

प्रत्येक पालक आपल्या मुलाने खोटे बोलणे शिकू नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतो, परंतु तरीही मुले अनेक वेळा खोटे बोलायला शिकतात. असे घडते कारण मुले इतरांना खोटे बोलतांना पाहून शिकतात आणि ही गोष्ट त्यांना साम ान्य वाटू लागते. त्यामुळे तुमच्या मुलाला खोटे न बोलण्यास शिकवण्याबरोबरच त्याला खोटे न ऐकण्यासही शिकवा.

पैशाचे महत्त्व पटवून देणे

भविष्य उज्वल असायला हवे आणि तुमच्या मुलाने भविष्यात यशस्वी व्हायचे असेल तर आजच त्याला पैशाचा योग्य वापर करायला शिकवले पाहिजे. जर तुम्ही हे करू शकत नसाल तर मुलाला जीवनात यशस्वी होणे कठीण होते. चांगली नोकरी मिळवण्याच्या गुणांसोबतच पैशाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे गुणही अंगी असणे अत्यंत आवश्यक आहे.

गोड बोलण्याचे फायदे

मुलाला सर्वांशी छान बोलायला शिकवा, कारण भविष्यात मूल जेव्हा छान बोलेल तेव्हा त्याला आयुष्यात अधिक संधी मिळतील आणि त्याच्या यशाची शक्यताही वाढेल. सर्वप्रथम, आपल्या मुलाला चांगले बोलायला शिकवा जेणेकरून तो आपल्या गोड बोलण्याने सर्वांची मने जिंकेल.

# स्वच्छतेमागचा दुर्गंध

## दूषित पाण्यामुळे दहा जणांचा मृत्यु



स्वच्छता मोहीम केवळ राबवून उपयोग होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भ्रष्टाचार व गलथानपणा यांचे दूषित पाणी मुरले आहे. त्यामुळे नागरी प्रशासनाची यंत्रणा गंजली आहे. हे दु:खद चित्र सार्वत्रिक आहे.

सरलेल्या वर्षाच्या अखेरीस इंदूर शहरात घडलेली घटना दु:खदायक आहे. दूषित पाण्यामुळे किमान दहा जणांचा मृत्यु ओढवला. त्यात एका बालकाचाही समावेश आहे. पिण्याचे पाणी पुरवणार्या नलिकेत-पाइपलाइन-शौचालयाचे पाणी मिसळले गेले, ते पाणी पिण्यामुळे हे नागरिक दगावले असे प्राथमिक चौकशीतून समोर आले आहे. ही घटना टाळता येण्याजोगी निश्चितच होती. महानगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष हे या मागचे कारण आहे. पिण्याचे पाणी दूषित होत असल्याची तक्रार शहराच्या भगिरथपुरा भागातल्या नागरिकांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी केली होती; पण स्थानिक नगरसेवक आणि महापालिका यांनी त्यास महत्त्व दिले नाही अशी माहिती आता उघड झाली आहे. गाव व शहरे यांना पाणीपुरवठा करण्याबाबत 'ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स'ने काही मानके निश्चित केली आहेत, त्यांचे पालन इंदूरमध्ये झालेले नाही हे या घटनेने दाखवून दिले आहे. पिण्याचे पाणी वाहून नेणार्या आणि मैला पाणी वाहून नेणार्या नलिका परस्परांपासून अंतरावर असणे आवश्यक आहे. त्या कोठेतरी फुटल्या आणि अस्वच्छ पाण्यातील विषाणू पिण्याच्या पाण्यात मिसळले, ते घरोघरी पोचले. त्याचा संसर्ग झालेल्या नागरिकांची संख्या पाहता पाहता वाढली. त्यातून आरोग्य सेवेचे दोषही उघड झाले.

**प्रशासन अपयशी–** दूषित पाण्यामुळे इंदूरमध्ये काही नागरिक मरण पावल्याच्या संदर्भात एका पत्रकाराने राज्याचे नागरी प्रशासन मंत्री कैलास विजयवर्गीय यांना प्रश्न विचारला. मंत्री महोदयांनी त्या प्रश्नाची निरर्थक, निरुपयोगी-यूजलेस अशी संभावना केली. भाजपचे राज्य सरकार नागरी प्रश्नांबाबत किती संवेदनाशील आहे ते त्यातून कळले. महानगरपालिका, नगर पंचायती आदी स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार देणारी घटना दुरुस्ती १९९२ मध्ये करण्यात आली. त्याची अंमलबजावणी १ जून १९९३ पासून सुरु झाली. तेव्हा पी.व्ही. नरसिंह राव पंतप्रधान होते. तळागाळात लोकशाही रुजावी, सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे हा या कायद्याचा उद्देश आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, पर्यावरणाचे रक्षण अशा अनेक बाबींकडे स्थानिक स्वराज्य संस्थांनी लक्ष पुरवणे त्याद्वारे अपेक्षित आहे; मात्र या संस्थांमध्ये पदे मिळवण्याची धडपड करणार्या बहुतेकांचे लक्ष या कायद्यातील 'जमिनीचे नियमन' या मुद्द्यावर जास्त असते. कारण त्यातून पैसा मिळतो. 'ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स'च्या मानकांनुसार शहरांतील पाणी पुरवठ्यावर स्थानिक स्वराज्य संस्थेने सतत देखरेख करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्यात विषाणू प्रवेश करणार नाहीत याची खबरदारी या संस्थेने घेतली पाहिजे. या मानकावर इंदूरची महानगरपालिका नापास झाली आहे. अन्य महापालिकांची कामगिरी फार चांगली आहे असेही नाही. स्वच्छता, पाणी पुरवठा, सुरळीत वाहतूक अशा मूलभूत सुविधा पुरवण्यात बड्या शहरांच्या महापालिका अपयशी ठरल्याचे वारंवार दिसले आहे. दूषित पाण्यामुळे कावीळ व अन्य रोगाची साथ पसरल्याचे वृत्त कोणत्यातरी शहरातून सतत येत असते. महापालिका व राज्य सरकारांतर्फे दवाखानेही चालवले जातात. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे पेचप्रसंग गंभीर झाल्यावर हे दवाखाने, तेथील मनुष्यबळ अपुरे पडले. हे देखील अनेक शहरांतील चित्र आहे. कर भरूनही सामान्य माणसाला सुविधा मिळत नसतील तर तो पैसा जातो कोठे हा प्रश्न आपोआप उभा राहतो. नागरिकांनी तक्रार केल्यावरही त्याची दखल का व कोणी घेतली नाही हे समोर आले पाहिजे. बळींची संख्या वाढल्यावर राज्य सरकार जागे झाले व चौकशी समितीची घोषणा झाली. महापौर, नगरसेवक यांनाही जबाबदार धरणार का? की पक्षाच्या माणसांना वाचवण्यासाठी केवळ अधिकार्यांवर कारवाई करून कार्यक्षमतेचा आव आणला जाणार? याचे उत्तर करदात्या नागरिकांना मिळाले पाहिजे. स्वच्छता मोहीम, जल जीवन मोहीम यांचा हवा तो परिणाम झालेला नाही, हे या घटनेतून दिसले. स्वच्छतेचे प्रथम पारितोषिक सलग आठ वर्षे मिळवणार्या इंदूरमध्ये नागरी प्रशासन कोलमडले आहे हा या मृत्युंचा अर्थ आहे.

# मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी येथे काही टिपा आहेत


**❒ निरोगी जीवनशैली राखा**

याशिवाय नियमित व्यायामाचे अनेक फायदे आहेत आपली कंबर कमी करणे. नियमित व्यायाम करून मूत्रपिंडाचा जुनाट आजार टाळता येतो. परिणामी, ते रक्तदाब कमी करते आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते, जे किडनीचे नुकसान टाळण्यासाठी महत्वाचे आहे.निरोगी जीवनशैलीसाठी मॅरेथॉन धावण्याची आवश्यकता नाही. तुमच्या आरोग्यासाठी चालणे, धावणे, सायकल चालवणे आणि अगदी नृत्य करणे अगदी योग्य आहे. तुम्हाला आनंद देणारा क्रियाकलाप निवडा आणि तुम्हाला व्यस्त ठेवेल. हे आपल्याला त्याच्याशी टिकून राहण्यास आणि उत्कृष्ट परिणाम प्राप्त करण्यात आणि मूत्रपिंडाचे आरोग्य राखण्यास मदत करेल.

**❒ रक्तातील साखरेची पातळी निरोगी ठेवा**

जर तुम्हाला मधुमेह किंवा उच्च रक्तातील साखरेची स्थिती असेल तर तुम्हाला मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. परिणामी, जेव्हा तुम्ही तुमच्या रक्तातील ग्लुकोज (साखर) वापरू शकत नाही तेव्हा तुमचे मूत्रपिंड तुमचे रक्त फिल्टर करण्यासाठी अधिक मेहनत घेतात. अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर याचा जीवघेणा परिणाम होऊ शकतो. तुम्ही तुमच्या रक्तातील साखरेचे व्यवस्थापन केल्यास, तुम्ही नुकसान होण्याचा धोका कमी करू शकता. शिवाय, जितक्या लवकर नुकसान ओळखले जाईल, तितके नुकसान कमी किंवा प्रतिबंधित होण्याची शक्यता जास्त आहे.

**(क्रमश: पुढील उद्याच्या अंकात)**



# पत्रकारितेत एआय: एक अपरिहार्य भविष्य

**विश्वनाथ गरुड**

पत्रकारितेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता कामाचा नित्यनियम बनत आहे. माहिती संकलन, बातमीचे लेखन आणि विविध पैलू समोर आणण्यासाठी एआय उपयुक्त ठरत आहे. यामुळे पत्रकारांची मेहनत वाचते. मात्र, एआयची विश्वसनीयता आणि भविष्यात मानवी नोकर्यांवर होणारा परिणाम ही मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे एआय स्वीकारून स्वत:चे वैशिष्ट्य जपण्यातच भविष्य आहे.

भारतीय पत्रकारितेमध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेच्या -एआय-च्या वापराला सुरुवात होऊन जवळपास दशक उलटलं .हा वापर इतका वाढणार आहे की तो आपल्या कामाच्या नित्यनियमाचा भाग होऊन जाईल. पत्रकारितेमध्ये एआयचा वापर मुख्यत्वे माहिती मिळवण्यासाठी केला जातो. तुम्ही गूगलवर जाऊन याअधी माहिती मिळवू शकत होता, पण एआयला तुम्ही योग्य कमांड दिल्यावर माहिती तुम्हाला हव्या त्या स्वरुपात हवी तशी संकलित करुन मिळते. वेगवेगळ्या लिंक्सवर क्लिक करुन नेमक्या माहितीचा शोध घेण्याची गरज तुम्हाला भासत नाही, तर एआय हे या गुगल सर्च इंजिनचे एडव्हान्स वर्जन आहे.

एआय फक्त माहिती संकलित करुन देतं का; तर नाही. एआय माहितीतील तुम्हाला महत्वाचा वाटणारा मुद्दा निवडून देऊ शकतं. पत्रकारितेमध्ये बातमीचे वेगवेगळे पैलू एआयमुळे समोर येतात. एआय तुम्हाला लेख लिहून देऊ शकतं, तुमच्या लेखाला वेगवेगळी शीर्षकं सुचवू शकतं. बातमी लिहून देऊ शकतं; किंबहुना याचसाठी एआयचा वापर होत आहे. देशपातळीवरील अनेक न्यूज रुमध्ये त्या त्या संस्थेने विकसित केलेले एआय आहेत. ते तेथील पत्रकारांना बातमीचा ड्राफ्ट लिहिण्यापासून पत्रकाराने लिहिलेला अर्धवट ड्राफ्ट पूर्ण करण्यापर्यंत मदत करू शकतात. एआय न्यूज अँकर तर आधीच न्युज चॅनलवर बातम्या देऊ लागल्या आहेत. न्युज चॅनलमधील पत्रकारांना मदत करण्यासाठी एआय रोबोही आहेत.

येत्या काळात हा वापर अधिक वाढेल, कारण बातमीचे वाचक आणि प्रेक्षक बातमीवर खर्च करायलाच तयार नाहीत. आज सोशल मिडियाच्या सद्दीमध्ये लोकांना माहिती इतकी सहज उपलब्ध होते आहे की माहितीसाठी त्यातही एखाद्या व्यक्तीने माहिती उत्तमरीत्या संकलित करुन बातमी तयार झाल्यावर वाचणार्यांची संख्या एआयने तयार केलेल्या बातम्या वाचणार्यांच्या संख्येपेक्षा खूप कमी आहे. त्यामुळे ज्या प्रकारे कोरोनाच्या काळामध्ये आपण त्या वास्तवासोबत जगण्याची सवय लावून घेतली होती, तसंच एआयही आपल्या पत्रकारितेचा अविभाज्य भाग होणार आहे. अशा वेळी एआय नको असं का म्हणावं? कारण सध्या एआयचं बेसिक वर्जन बाजारात असलं तरी पुढची ॲडव्हान्स वर्जन्स मानवी निर्मितीक्षमतेला आव्हान देणारी असतील. एआयमध्ये इतके उच्च पातळीचे बदल केले जातील की एखाद्या लेखकापेक्षाही चांगलं लेखन एआय देऊ शकेल. याला अजून बराच अवकाश असला तरी ते नक्कीच होईल. आता यामुळे पत्रकारितेत्या भविष्यातल्या संधींवर नक्कीच परिणाम होणार. यात पन्नास टक्क्यांहुनही अधिक नोकर्या जातील. परंतु याला पर्याय नाही आणि त्यामुळे याकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. मराठी पत्रकारितेबद्दल बोलायचे झाले तर आजच्या काळात डिजिटल पत्रकारितेमध्ये दिवसाला १२ ते १५ बातम्यांचं टार्गेट दिलं जातं. या बातम्या मोठ्या असाव्यात अशीही अट असते. तेव्हा एआयची मदत घ्यावीच लागते. सध्या मराठीमध्ये बातमी लेखनासाठी अथवा लेख लिहिण्यासाठी एआयचा वापर मर्यादित आहे. तसेच त्यात काही सुसूत्रता नाही, ते विखुरलेले आहे. पण लवकरच याला चांगला आकार येईल आणि मराठीमध्ये लिखाणासाठी एआयचा उपयोग वाढेल. आता यामध्ये मुख्य आव्हान आहे ते एआयची विश्वासार्हता आणि कॉपीराईटची मर्यादा जपण्याचे. एआय देत असलेल्या माहितीची खातरजमा करुन घ्यावी लागते, कारण ती शंभर टक्के वस्तुनिष्ठ असेलच असं नाही. माहिती पडताळून घ्यावीच लागते. यात मजकुराच्या चोरीची समस्या कमी असते, कारण एआय वेबसाईटवरील वाक्य जशीची तशी उचलत नाही, तर फक्त डेटा उचलून ती माहिती स्वत:च्या शब्दांमध्ये लिहिते. त्यासाठी एआयमध्ये आधीच शब्द फीड केलेले असतात. ज्याप्रमाणे एखाद्या बातमीला अथवा लेखाला सुरुवात, मध्य आणि शेवट असतो त्याच स्वरुपात एआय माहिती देते. त्यामळे एआय साहित्यचौर्य पकडू शकत नाही.



कॉपीराईटचा मुद्दाही ठराविक ठिकाणी उद्भवतो. उदा. एखाद्या मोठ्या चॅनलच्या लोगोप्रमाणे लोगो तयार करणे. त्याचे नाव जसेच्या तसे नसले तरी त्याची रंगसंगती, आकार तसेच वापरुन व्हिडिओवर ते लोगो म्हणून वापरले जाण्याला आव्हान देण्याची कोणतीही यंत्रणा आपल्याकडे नाही. एआय जसा मजकूर देते, तसे व्हिडिओ देते, फोटो देते, ग्राफिक्स देते. हे धुळफेक करणारे असू शकतात आणि त्याला कुठेही रोखता येऊ शकत नाही. तसे कायदे आपल्याकडे अस्तित्वात नाहीत. इतकंच नाही तर एखाद्या लेखकांचं मुबलक लिखाण इंटरनेटवर उपलब्ध असेल तर त्याची लेखनशैलीही कॉपी करण्याचे कौशल्य एआयकडे आहे. आता याला आव्हान कसे देणार?सोशल मीडियामुळे जिथे सर्वच लेखक होऊ पाहत आहेत माहितीचा भडिमार हा या सर्व सोशल माध्यमांतून होतो. त्यामुळे माहितीची कमतरता नाही. पण विश्लेषण करणार्या तज्ज्ञांचीही जागा एआय घेऊ लागला आहे. अगदी आज एखादं विश्लेषण करायचं म्हटलं तर एआय च्या मदतीने अगदी सखोल आणि अचूक विश्लेषण देणारी माहिती मिळवून काहीजण माहितीही नसलेल्या विषयात तज्ज्ञ होत आहेत. फक्त सद्यस्थितीत ज्या प्रकारे काही मिडिया हाऊसेस एखाद्या राजकीय किंवा विचारसरणीच्या प्रभावाखाली काम करतात, तसे एआय करत नाही. पण हा धोका भविष्यात एआयलाही आहे, कारण एआय तयार करणार्या यंत्रणा अथवा संस्था या समाजसेवेसाठी नाही, तर अर्थार्जनासाठी बाजारात आल्याने त्यांच्याकडूनही विश्वासार्हतेची फार अपेक्षा केली जाऊ शकत नाही. अशा वेळी आपल्या भविष्यातल्या संधी एआयने गिळू नये यासाठी काय करावे हे जाणून घेणे महत्वाचे ठरेल. आपले विषय, विशिष्ट अशी लेखनशैली आवडणारे फॅन फॉलोअर्स तयार करणं हे अर्थार्जन तसेच आपले या क्षेत्रातील नाव टिकवून ठेवण्यासाठी फायद्याचे ठरेल. तुम्ही एआयला स्वीकारत स्वत:चं वैशिष्ट्य कसं जपता, यावर हा येणारा पुढील काळ अवलंबून आहे. एआयपासून लांब पळण्यापेक्षा एआयला काय कमांड दिली की तो कशा प्रकारे परिणाम दर्शवतो हे शिकणं आताच्या काळातही गरजेचं आहे. त्यासाठी वेगवेगळे अभ्यासकक्रम आहेत. एआय ही एखादी व्यक्ती नसून तंत्रज्ञान आहे. तुम्ही त्याला विचारलेल्या प्रश्नाचे योग्य असे उत्तर उत्तमरित्या मांडणी करुन ते तुम्हाला देते. ते तुम्हाला हवी ती माहिती सुबक पद्धतीने समोर मांडते. त्यामुळे मेहनत वाचते. हे सध्या सुरुवातीच्या टप्प्यात असले तरी एआय इतके परफेक्ट होणार आहे की त्यात माहितीच्या किंवा लिखाणाच्या चुकाच नसतील आणि हे केवळ माध्यमांपुढे नाही तर सर्वच क्षेत्रांपुढे आव्हान असेल.

एआय हे वर्तमान आणि भविष्य आहे. पत्रकारितेसह सर्वच क्षेत्रांनी या अपरिहार्य तंत्रज्ञानाला स्वीकारणे गरजेचे आहे. एआयमुळे माहितीचे संकलन आणि सादरीकरण सुबक, वेगवान झाले आहे, ज्यामुळे मानवी मेहनत वाचते. तथापि, या बदलांसोबतच नोकरीच्या संधी कमी होणे आणि एआयच्या विश्वासार्हतेची खात्री करणे ही मोठी आव्हाने आहेत. एआयपासून लांब पळण्याऐवजी, त्याचा योग्य वापर करून आपले वैशिष्ट्य जपणे हाच भविष्याचा मंत्र आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...स्पिनिंग या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं.

## २ Joke विनोद






राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## ३ Message संदेश




Tourist = Ye kiska kankaal hai..? Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## ४ Thought सुविचार

शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.- कार्लाइल




**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### ऑस्ट्रेलियाचे सिडनी कसोटीत पुनरागमन

सिडनी,५ जानेवारी (पीएसआय)
ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड क्रिकेट संघात सुरु असलेल्या अॅशेस मालिकेतील पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडला ८४ धावांवर गुंडाळल्यानंतर, ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा २ बाद १६६ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडे अजूनही २१८ धावांची आघाडी आहे. सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाहुण्या संघाने त्यांच्या पहिल्या डावात ३८४ धावा केल्या. जो रुटने संघासाठी शतक ठोकले.
जो रुटने ४१वे कसोटी शतक : प्रथम फलंदाजी करताना इंग्लंड संघाने ५७ धावांवर तीन विकेट गमावल्या होत्या. जो रुटने हॅरी ब्रूकसोबत चौथ्या विकेटसाठी १६९ धावांची भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या २२६ पर्यंत नेली. दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ब्रूक ९७ चेंडूत ८४ धावा करुन बाद झाला, ज्यामध्ये एक षटकार आणि सहा चौकारांचा समावेश होता.

### व्हीएचटी मध्ये अचानक बदलला संघाचा कर्णधार

मुंबई–बीसीसीआयने नुकतीच न्यूझीलंड क्रिकेट संघाविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. शुभमन गिल तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत संघाचे नेतृत्व करेल. दरम्यान, श्रेयस अय्यरला या मालिकेसाठी उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. दरम्यान, अय्यरबाबत महत्त्वाची बातमी समोर आली आहे.
अय्यरला महत्त्वाची जबाबदारी : खरंतर, न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेपूर्वी श्रेयस अय्यरला एक महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्याला अनपेक्षितपणे संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. अय्यरला विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईचं कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. यापूर्वी, शार्दुल ठाकूर विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईचे कर्णधारपद भूषवत होता. आता, अय्यर त्याच्या जागी संघाची सूत्रे सांभाळेल. दुखापतीमुळं शार्दुल ठाकूरला या प्रतिष्ठित घरगुती ५० षटकांच्या स्पर्धेतून बाहेर काढण्यात आलं आहे. परिणामी, अय्यरला ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

### कुटुंबाची मेगा भरतीभोवली, एमसीए निवडणूक स्थगित

पुणे–महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार यांना मुंबई उच्च न्यायालयाने दणका दिला आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची मंगळवार ६ जानेवारीला होणारी निवडणूक स्थगित झाल्याची माहिती समोर आली आहे. एमसीए निवडणुकीसाठी मतदान करणाऱ्यांच्या यादीमध्ये आमदार रोहित पवार यांच्या पत्नी कुंती पवार, सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे, रोहित पवार यांच्या सासरची मंडळी आणि ज्यांच्या क्रिकेटशी संबंध नाही, असे नातेवाईक, राजकीय व्यक्ती आणि कार्यकर्त्यांची नावे मतदार यादीत घुसवल्याचा आरोप रोहित पवारांवर झाला होता.यादीमधील मतदारांचे क्रिकेटसाठी योगदान काय? असा प्रश्न उपस्थि करत माजी क्रिकेटपटू केदार जाधव याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने उच्च न्यायालयाने मंगळवारी होणारी अध्यक्षपदाची निवडणूक स्थगित केल्याची माहिती समोर आली आहे.

# वैभव सूर्यवंशीने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध रचला इतिहास



**बेनोनी :** दक्षिण आफ्रिकेच्या १९ वर्षांखालील संघाविरूद्धच्या एकदिवसीय सामन्यात भारताच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघाचे नेतृत्व वैभव सूर्यवंशीने केले. कर्णधार म्हणून त्याच्या पहिल्या सामन्यात, तो १२ चेंडूत फक्त ११ धावा करू शकला, पण असे असूनही, हा सामना त्याच्या कारकिर्दीतील एक ऐतिहासिक कामगिरी ठरला.

सूर्यवंशीने विक्रम केला

वयाच्या १४ व्या वर्षी, सूर्यवंशी युवा एकदिवसीय सामन्यात संघाचे नेतृत्व करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. यासोबतच, तो १६ वर्षांच्या आधी कोणत्याही फॉरमॅटमध्ये आंतरराष्ट्रीय १९ वर्षांखालील सामन्यात संघाचे नेतृत्व करणारा पहिला क्रिकेटपटू बनला...त्याने इतिहास रचला. या कामगिरीसह त्याने पाकिस्तानच्या अहमद शहजादचा १९ वर्षांचा विक्रम मोडला. नियमित कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा दुखापतीमुळे खेळू शकणार नव्हते. यामुळे सूर्यवंशीला तीन सामन्यांच्या मालिकेसाठी कर्णधारपद देण्यात आले. तथापि, १५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी दोन्ही खेळाडू पुनरागमन करतील अशी अपेक्षा आहे.

वैभव सतत खळबळ उडवत आहे

वैभव सूर्यवंशी विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याच्या विक्रमी आणि स्फोटक फलंदाजीने चर्चेत आला होता. रांची येथे अरुणाचल प्रदेशविरुद्ध बिहारकडून खेळताना त्याने फक्त ३६ चेंडूत शतक झळकावले. त्याने ८४ चेंडूत १६ चौकार आणि १५ षटकारांसह १९० धावांची धमाकेदार खेळी केली. यामुळेच बिहारने अरुणाचल प्रदेशवर ३९७ धावांचा मोठा विजय मिळवला... या ऐतिहासिक खेळीदरम्यान, वैभव सूर्यवंशीने लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात जलद १५० धावा करण्याचा एबी डिव्हिलियर्सचा जुना विक्रमही मोडला...त्याने ही कामगिरी १० चेंडू आधी केली.शिवाय, त्याने त्याच्या डावात मारलेले १५ षटकार हे लिस्ट ए फॉरमॅटमध्ये कोणत्याही भारतीय फलंदाजाने मारलेले सर्वाधिक षटकार आहेत.
ज्युनियर आणि डोमेस्टिक क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरीच्या आधारे, सूर्यवंशीची अलीकडेच २०२५–२६ रणजी ट्रॉफी हंगामाच्या पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये संघाचे नेतृत्व करण्यासाठी निवड करण्यात आली. तसेच २०२० च्या १९ वर्षांखालील संघासाठी बिहारचा उपकर्णधार म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवाय, अलीकडेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्याचा सन्मान केला. त्याला प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार (झचठ्इझ) देखील प्रदान करण्यात आला. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार हा भारतातील १८ वर्षांखालील मुलांसाठीचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे, जो विविध क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी आणि उत्कृष्टतेसाठी ५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना दिला जातो.



## रूट–ब्रुक यांच्यात नाबाद शतकी भागीदारी

सिडनी : ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील शेस २०२५–२६ चा पाचवा म्हणजेच अंतिम कसोटी सामना सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळला जात आहे. पहिल्या दिवशी पाऊस आणि खराब प्रकाशामुळे केवळ ४५ षटकांचा खेळ होऊ शकला. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत संघाने ३ गडी गमावून २११ धावा केल्या आहेत. जो रूट (७२) आणि हॅरी ब्रूक (७८) नाबाद परतले. दोघांमध्ये १५४ धावांची अभेद्य भागीदारी झाली आहे. दुसर्या दिवसाचा खेळ सोमवारी सकाळी भारतीय वेळेनुसार ४:३० वाजता सुरू होईल. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरत आहे. इंग्लंडचे सुरुवातीचे ३ बळी लवकर पडले होते. ५७ धावांवर इंग्लंडचे ३ बळी पडले होते. त्यानंतर जो रूट आणि हॅरी ब्रूकने इंग्लंडचा डाव सांभाळला. पहिल्या दिवशी इंग्लंडची धावसंख्या २११ धावा होती. रूट आणि ब्रूक दोघेही अर्धशतके झळकावून नाबाद परतले.यापूर्वी, बेन डकेट २७, जॅक क्रॉली १६ आणि जेकब बेथेल १० धावा करून बाद झाले. ऑस्ट्रेलियासाठी मिचेल स्टार्क, मायकेल नेसर आणि स्कॉट बोलंड यांना प्रत्येकी १–१ बळी मिळाला.
सिडनी कसोटीसाठी दोन्ही संघांचे प्लेइंग ११
ऑस्ट्रेलिया: ट्रॅव्हिस हेड, जेक वेदरल्ड, मार्नस लाबुशेन, स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), उस्मान ख्वाजा, लेक्स कॅरी (यष्टीरक्षक), कॅमेरॉन ग्रीन, ब्यू वेबस्टर, मायकेल नेसर, मिचेल स्टार्क, स्कॉट बोलंड. इंग्लंड: जॅक क्रॉली, बेन डकेट, जेकब बेथेल, जो रूट, हॅरी ब्रूक, बेन स्टोक्स (कर्णधार), जेमी स्मिथ (यष्टीरक्षक), विल जॅक्स, ब्रायडन कार्स, मॅथ्यू पॉट्स, जोश टंग.

## राष्ट्रीय रोलर बास्केटबॉल स्पर्धेत जालन्याच्या खेळाडूंना पदक

जालना–नांदेड येथे संपन्न झालेले पाचवे राष्ट्रीय रुलर बास्केट बॉल स्पर्धेत विविध राज्यातून वयोगट १४ वर्षीय, १७ वर्षीय व १९ वर्षीय सीनियर मुले व मुली या गटात १५ राज्य चे खेळाडूंनी सहभाग नोंदवल होता. सदस्य स्पर्धा ही स्पोर्ट्स रुलर बास्केटबॉल फेडरेशन तर्फे आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा स्केटिंग रिंग बाबा नगर नांदेड येथील स्केटिंग रिंग मैदानावर २८ डिसेंबर ते ३० डिसेंबर रोजी या स्पर्धा आयोजित केले होते. या स्पर्धक चारशे ग्रामीण सहभाग नोंदविला होता यामध्ये महाराष्ट्र संघामध्ये १४ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला यामध्ये जालन्याच्या ४ खेळाडूंनी समावेश होता व उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदक पटकावले खेळाडूंचे नाव कयान बुरुंदिया, एहसास अग्रवाल, इब्राहिम सिद्दिकी आणि यश बुरुंदिया खेळाडूंचे नाव आहे. या सर्व खेळाडूंना रुलर बास्केटबॉल फेडरेशनचे सचिव इमरान खान तसेच महाराष्ट्राचे अध्यक्ष देवानंद नेमाने पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच जालना स्केटिंग असोसिएशनचे अध्यक्ष अमजद पठाण, उपाध्यक्ष प्रवीण पाचपुले, अरविंद देशमुख, सय्यद शब्बीर शाकीर खान सर्वांचा सहकार्य लाभले.

# केकेआर ला मिळाली मुस्तफिजूर बांगलादेशाच्या रहमानची रिप्लेसमेंट?



मुंबई,–गेल्या काही काळापासून बांगलादेशचा खेळाडू मुस्ताफिजुर रहमान आणि त्याच्या आयपीएल मध्ये असलेल्या उपस्थितीमुळे वाद निर्माण झाला. मुस्ताफिजुर रहमानसाठी भारत–बांग्लादेश संबंधांतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता. मुस्ताफिजुर रहमानला संघातून रिलीज केल्यानंतर कोलकाता नाईट रायडर्ससमोर त्यांच्या जागी योग्य खेळाडू शोधण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर माजी भारतीय क्रिकेटपटू श्रीवत्स गोस्वामी यांनी एका वेगवान आणि जबरदस्त अशा खेळाडूचे नाव पुढे केले असून, तो खर्‍ीसाठी 'गेमचेंजर' ठरू शकतो, असा त्यांचा दावा आहे.
९.२० कोटी रुपयांना घेतले होते विकत
आगामी आयपीएल पूर्वी केकेआर पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. २०२६ च्या लिलावात ९.२० कोटी रुपयांची मोठी बोली लावून संघात घेतलेल्या मुस्ताफिजुर रहमानला, अलीकडील घडामोडींनंतर बीसीसीआयच्या निर्देशानुसार संघाबाहेर काढावे लागले. त्यामुळे आता त्यांच्या जागी कोण खेळाडू येणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले आहे की, केकेआर ला मुस्ताफिजुरच्या बदल्यात दुसऱ्या खेळाडूला संघात घेण्याची मुभा आहे. यानंतर सोशल मीडियावर आणि क्रिकेट विश्वात विविध नावांची चर्चा सुरू झाली. याच दरम्यान श्रीवत्स गोस्वामी यांनी एका वेगळ्या पण प्रभावी पर्यायाकडे लक्ष वेधले आहे.
कोण आहे हा खेळाडू?
गोस्वामी यांच्या मते, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज डुआन यानसेन हा केकेआर साठी उत्तम पर्याय ठरू शकतो. डुआन हा स्टार ऑलराउंडर मार्को यानसेनचा जुळा भाऊ असून, त्याची ओळख वेगवान आणि अचूक गोलंदाजीसाठी आहे. तो सातत्याने १४० ते १४५ किमी प्रतितास वेगाने चेंडू टाकण्याची क्षमता ठेवतो.केकीआर च्या गरजांशी जुळणारा प्रोफाइल डुआन यानसेन केवळ वेगवान गोलंदाजच नाही, तर उपयुक्त फलंदाजही आहे. टी२० क्रिकेटमध्ये अशा प्रकारचा ऑलराउंड पर्याय कोणत्याही संघासाठी फायदेशीर ठरतो. विशेष म्हणजे, त्याने २०२३ मध्ये मुंबई इंडियन्सकडून एक आयपीएल सामना खेळला असून, भारतीय परिस्थितीचा त्याला काहीसा अनुभव आहे.
एसए२० लीगमध्ये दमदार कामगिरी
२५ वर्षीय डुआन यानसेन सध्या एसए२० लीग २०२५–२६ मध्ये जोबर्ग सुपर किंग्सकडून खेळताना दिसत आहे. प्रिटोरिया कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात त्याने चार षटकांत केवळ २३ धावा देत चार विकेट्स घेतल्या आणि सामनावीराचा पुरस्कार पटकावला. ही कामगिरी त्याच्या क्षमतेची साक्ष देणारी मानली जात आहे.आतापर्यंत डुआनने पाच वेगवेगळ्या संघांसाठी खेळत ४८ टी२० सामने खेळले असून, त्यात त्याने ४६ विकेट्स घेतल्या आहेत आणि ३२९ धावांची भरही घातली आहे.
केकेआर साठी हा निर्णय ठरेल उत्तम?
तरुण आणि अनकॅप्ड खेळाडूंवर विश्वास ठेवण्याची परंपरा केकेआर कडे आहे. अशा परिस्थितीत डुआन यानसेनसारखा वेगवान, आक्रमक आणि ऑलराउंड क्षमता असलेला खेळाडू संघाच्या रणनीतीत अचूक बसणारा ठरू शकतो.

## २०३६ मध्ये क्रीडा महाकुंभाचे आयोजन करण्याचे उद्दिष्ट; जय शाह यांचे मोठे विधान

अहमदाबाद–आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी २०३६ च्या ऑलिंपिक खेळांच्या आयोजनाबाबत एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. जय शाह यांनी सांगितलं की, २०३० च्या राष्ट्रकुल खेळांचं आयोजन केल्यानंतर, भारताचे २०३६ चे ऑलिंपिक खेळ गुजरातमध्ये आयोजित करण्याचं उद्दिष्ट आहे. त्यांनी २०३६ च्या ऑलिंपिकमध्ये भारतासाठी १०० पदकं जिंकण्याचं ध्येय देखील ठेवले आहे. शहा यांचे हे विधान सुरतमधील मरन फॉर गर्ल चाइल्डफ मॅरेथॉन दरम्यान आले. त्यांनी नमूद केले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० चे राष्ट्रकुल खेळ गुजरातमध्ये आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसंच २०३० च्या राष्ट्रकुल खेळांनंतर, २०३६ चे ऑलिंपिक खेळ इथं आयोजित करण्याचं ध्येय असल्याचं शाह म्हणाले.
अहमदाबादमध्ये होणार राष्ट्रकुल खेळ : अहमदाबादला अलीकडेच २०३० च्या राष्ट्रकुल खेळांचं यजमानपद देण्यात आलं. हे भारताचे दुसरे राष्ट्रकुल खेळ असतील. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल स्पर्धा झाल्या होत्या. २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमधील भारताच्या कामगिरीचा उल्लेख करताना जय शाह म्हणाले की, भारतानं त्या ऑलिंपिकमध्ये आठ पदकं जिंकली होती, परंतु २०३६ पर्यंत देशानं किमान १०० पदकं जिंकण्याचं ध्येय ठेवलं पाहिजे. यापैकी १० पदकं गुजरातमधील खेळाडूंकडून मिळायला हवीत असंही ते म्हणाले. महिला खेळाडूंबद्दल बोलताना जय शाह यांनी विश्वास व्यक्त केला.

## व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्ल्यामुळे लॅटिन अमेरिकेत युद्धाचे सावट

# व्हेनेझुएलावरील हल्ल्यावरुन आयलंड क्रिकेटने उडवली डोनाल्ड ट्रम्प यांची खिल्ली?

नवी दिल्ली–एकीकडे, व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्ल्यामुळे लॅटिन अमेरिकेत युद्धाचे सावट निर्माण झालं आहे आणि या हल्ल्यावरुन जग दोन गटांत विभागले गेले आहे. दरम्यान, मजेशीर सोशल मीडिया पोस्टसाठी प्रसिद्ध असलेल्या आयलंड क्रिकेट बोर्डानं या गंभीर मुद्द्याचीही खिल्ली उडवली आहे. आयलंड क्रिकेटनं एक पोस्ट केली आहे ज्यामध्ये त्यांनी व्हेनेझुएला आणि ग्रीनलँडचा उल्लेख करुन स्वत:ची खिल्ली उडवली आहे. मात्र, आयलंड क्रिकेटची ही विनोदी पोस्ट अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना टोमणे मारणारी असल्याचे दिसून येते. परंतु, आयलंड क्रिकेटच्या स्वत:च्या क्रिकेटपटूंनी या पोस्टवर नाराजी व्यक्त केली आहे, ज्याचा आयलंड क्रिकेटनं रिट्विटमध्ये उल्लेख केला आहे.



आयलंड क्रिकेटने काय लिहिले? : आयलंड क्रिकेटने ३ जानेवारी रोजी व्हेनेझुएलावर अमेरिकेच्या हल्ल्याच्या दिवशी एक पोस्ट केली. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले आहे की, ''व्हेनेझुएलामध्ये तेल आहे, ग्रीनलँडमध्ये दुर्मिळ खनिजे आहेत. सुदैवाने, आयलंडमध्ये फक्त ज्वालामुखी, हिमनद्या आणि अत्यंत सामान्य क्रिकेटपटू आहेत.'' व्हेनेझुएलावर हल्ला करण्याव्यतिरिक्त, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार ग्रीनलँडला जोडण्याची धमकी देखील दिली आहे. परिणामी ही पोस्ट त्यांच्यावर टोमणे मारणारी म्हणून पाहिली जात आहे.

आयलंड क्रिकेटर्सनी व्यक्त केली नाराजी : युरोपच्या नॉर्डिक प्रदेशातील एका लहान देश आयलंडमधील क्रिकेटर्सनी त्यांच्या बोर्डाच्या पोस्टवर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी आयलेड क्रिकेटने त्यांचे ट्विट बदलावे अशी मागणी केली आहे. ४ जानेवारी रोजी आयलंड क्रिकेटने पोस्ट रिट्विट केली आणि लिहिले की, ''आमच्या खेळाडूंनी पोस्टचा सूर बदलण्याची विनंती केली आहे. त्यांना 'अत्यंत सरासरी' म्हटले जाण्यास आक्षेप आहे आणि त्याऐवजी 'अत्यंत निराशाजनक' हा शब्द पसंत करतात.''

आयलंड क्रिकेट नेहमी करते मजेशीर पोस्ट : आयलंड आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचा (घ्ण्ण) सहयोगी सदस्य आहे. त्यांचे क्रिकेट बोर्ड असे विनोदी पोस्ट करत राहते. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय क्रिकेट संघाच्या क्लीन स्वीपनंतर, त्यांनी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरबद्दलही असेच ट्विट केले होते. गंभीरवर निर्देशित केलेल्या ट्विटमध्ये त्यांनी लिहिलं की, ''आमच्याकडे मुख्य प्रशिक्षकपदाची जागा रिक्त आहे, परंतु भारतीयांनी अर्ज करु नये.'' आयलंड क्रिकेटच्या एक्स (पूर्वीचे ट्विटर) हँडलवर अशाच पोस्ट वारंवार पाहिल्या जाऊ शकतात.

# भगवान गौतम बुद्ध, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन

# माजी मंत्री आ. अमित देशमुख व वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची नालंदा बौद्ध विहारास भेट

**लातूर/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील प्रकाश नगर भागातल्या नालंदा बौद्ध विहार येथे जाउन भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर शहर महानगर पालिका निवडणूकीच्या निमित्ताने आज आपण या ठिकाणी एकत्रित जमलो आहोत. येणाऱ्या काळाचा वेध घेत सुजात आंबेडकर यांची ही आजची भेट ऐतिहासिक ठरेल आणि आपण याचे सार्वजन साक्षीदार आहात ही अभिमानाची बाब आहे.निवडणूक म्हटले की रुसवे फुगवे हे आलेच पण जेव्हा हेतू शुद्ध प्रामाणिक असतो तेव्हा एखादे उद्दिष्टे आपल्याला जेव्हा सध्या करायचे असते तेव्हा त्याग बलिदान द्यायला लागते आणि भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आपण अनुयायी असल्याने आपल्याला हे सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

**लातुर शहर महानगरपालिकेवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकणारच – अमित देशमुख**

लातुर शहर महानगरपालिकेवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकविण्यासाठी आपण एकत्र आलो असून आपला या निवडणुकीत ९० टक्के स्ट्राईक रेट असणार आहे. म्हणजे ७० पैकी ६३ जागा लातुर महानगरपालिकेत आपल्यामुळे निवडून येतील आणि याचा संकल्प आज आपण या ठिकाणी करतो आहे. आज परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज युवा नेते सुजात आंबेडकर आपल्यामध्ये आहेत हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे. पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, आम्हाला आमच्या वाडवडिलांनी जी शिकवण दिली आहे ते आम्ही अजिबात विसरलेले नाहीत. आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनि नेहमी संविधानाचा सन्मान केला. संविधानाने आपल्याला जे अधिकार दिले याची सुरक्षा व पालन करण्याचे काम त्यांनी केले आणि त्यांनी दिलेली शिकवण यावर आम्ही चालतो आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या स्नेहाची आपल्याला कल्पना असून नेहमी आमचे आदराचे स्थान आदरणीय बाळासाहेब आंबेडकर व कुटुंबीय राहिलेले आहेत असे आमदार देशमुख म्हणाले.

**सुजात आंबेडकरांना उज्वल भविष्य**

कालच्या सभेत सुजात आंबेडकर यांनी जे लातुर महानगरपालिका आणि प्रशासकाने केलेला मागील काळातील कारभार यावर भाष्य केले यावरून असेच दिसते की त्याचे भवितव्य अतिशय उज्वल आहे. आणि आपल्याला त्यांच्याकडून विकासाच्या संदर्भात असलेल्या सर्व अपेक्षा साध्य होतील यात शंका नाही असे म्हणत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची वैचारिक धार येणाऱ्या काळात अधिक धारदार होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**लातूरला साजेसे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक**

आपल्या जाहीरनाम्यात कांही बाबी सुजात आंबेडकर यांनी कालच्या सभेत सुचविल्या त्या आपण नमुद केल्या असून लवकरच आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होईल असे सांगत लातुर मधील नालंदा बौद्ध विहार हे एकमेव असे बुद्ध आहे हे जे आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या निधीतून या ठिकाणी आपण साकारू शकलो आहे. या बौद्ध विहाराकडून

आजातागायत उत्तम असे समाजकार्य केले जाते यासाठी लागणारा निधी कधीही कमी पडू दिला नाही यापुढे देखील कमी पडणार नाही असे त्यांनी सांगितले. तसेच लातुर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारलं जावं अशी इच्छा आहे तशी चर्चा होते याबाबत आम्ही सुजात आंबेडकर एकत्रित चर्चा करून ते स्मारक कसे असावे याची रुपरेषा ठरवून स्मारक यभे करण्याचा शब्द देत याला विरोधक दृष्ट लावतील ती दृष्ट आपण दोघे मिळून काढू आणि लातूरला साजेसे असे परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू असे त्यांनी सांगितले.

लातुर शहर महानगरपालिकेत महायुतीने जी लूट माजवली आहे. ब्रिटिश काळात जशी मनमानी होती तशी मनमानी मंत्रालय सचिव व मनपातील अधिकारी यांनी प्रशासक काळात केली असून याचा बंदोबस्त काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी कडून आपक्याला करायचा असून ही निवडणूक आपल्याला मिळालेली ही संधी आहे.या संधीचे आपल्याला सोने करायचे आहे आणि एकत्रित येऊन आपल्याला हे काम करायचे असून आपल्या सहकार्याचा सन्मान सर्वानी राखावा,एकदिलाने आपले उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी आणि लातुर शहरातील काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवाराना प्रचंड आशा बहुमताने विजयी करून लातुर महानगरपालिकेत पाठवावे व आपली सत्ता आणावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना युवा नेते सुजात आंबेडकर म्हणाले की, लातुर मनपा निवडणूक निमित्ताने आपण एकत्र आलो असून मागील प्रशासकराज असलेल्या काळात लातुर मनपामध्ये आपण जो होत असलेला भ्रष्टाचार पाहतो आहे या भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्याची वेळ आणि या निवडणुकीच्या माध्यमातून आपल्याला एक संधी आलेली असून या संधीचे सोने आपण करावे असे आवाहन त्यांनी केले.

**सत्ताधारी ऐकमेकांचे पाय ओढण्यात व्यस्त**

आपण सद्या पाहतोय राज्यातील तीन भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षाचे अलायन्स सरकार आहे आणि हे एकमेकांच्या उमेदवाराणा पडण्याची जणू शर्यतच लावुन आहेत. त्यांच्याकडून एकमेकांचे पाय ओढण्याचे काम या निवडणुकीत सुरू आहे. यांना जनतेचे कल्याण करण्यात स्वारस्य नाही तर केवळ खुर्चीत स्वारस्य असल्याचे त्यांनी सांगीतले.

**काँग्रेस व वंचीत आघाडीच्या उमेदवारांना विजयी करावे**

आपल्याला माहिती आहे कॉंगेसचा मूळ मतदार हा आजही काँग्रेस पक्षाच्या बाजूनेच आहे त्यामुळे आपणाला केवळ त्यांच्यापर्यंत पोहचायचे आहे आणि आपल्या काँग्रेस व वंचित बहुजन आघडीच्या उमेदवारांना अधिकाधिक मतदान कसे मिळेल याकडे लक्ष द्यायला हवे असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, वंचित बहुजन अघडीत मेहनत घेणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि त्यातही युवकांना व बहुजनांचे उमेदवार देऊन त्यांना सत्तेत नेण्याचे काम व त्यांना बळ देण्याचे काम बाळासाहेब आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीने यांनी केले असून यापुढेही करीत राहील असे म्हणत कार्यकर्त्याना त्यांनी आश्वस्त केले.

**सत्ताधाऱ्याच्या भुलाथापांना बळी पडू नका**

मतदानाच्या एक दिवस आधी आपल्याकडे काही लोक येतील अमिश दाखवतील, यांच्या भूलथापांना आपण अजिबात बळी पडू नये. आपल्यातील काही लोक भाजपच्या बाजूने जात आपल्याला देखील आपल्या समाजासोबत जाण्यास सांगितील अशांना आपल्या दारात देखील थांबवू नये आशा कमळाबाई सोबत जाणाऱ्या समजातील गद्दाराणा त्यांची जागा या निवडणुकीत दाखवावी आणि प्रचंड बहुमताने राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन अघडीच्या उमेदवाराणा विजयी करून आपली व आपल्या समाजाची सेवा करण्यासाठी मनपा मध्ये पाठवावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी लातूर महिला जिल्हाध्यक्ष मंजुषा निंबाळकर,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या प्रभाग क्रमांक ११ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार विकास वाघमारे छाया बंडगर सुजाता अजनीकर, पवन सोलंकर प्रभाग १२ मधील उमेदवार जयश्री सोनकांबळे धोंडीराम यादव, फिरदोस शेख,सतीश साळुंके,प्रभाग १३ मधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवक पदाचे उमेदवार अमोल लांडगे, शाहीन मणियार, कमल सोमवंशी, बालासाहेब देशमुख, प्रभाग १४ मधील उमेदवार रेणुका शिंदे,संतोष नरटे, दिपाली हविले, गणेश एस.आर. देशमुख ,नालंदा बौद्ध विहार ट्रस्टच्या अध्यक्षा-शशिकला सुरवसे,सचिव- उषा सोनकांबळे,लातूर जिल्हा महासचिव-रोहित सोमवंशी,श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन सचिन पाटील,२१ शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख,सूर्यकांत कातळे, भालचंद्र सोनकांबळे,उत्तमराव कांबळे,नारायण कांबळे, शिरीष दिवेकर,डॉ.विजय अजनीकर, राजेसाहेब सवई, निलेश देशमुख,प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी,किरण बनसोडे, नागसेन कामेगावकर, विजय गायकवाड,आयुब मणियार, संजय ओहळ,सुनील काळे आदिसह काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीचे विविध पदाधिकारी, निरीक्षक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते प्रभाग क्रमांक १३ मधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवक पदाचे उमेदवार अमोल लांडगे,शाहीन मणियार कमल सोमवंशी,बालासाहेब देशमुख यांच्या संपर्क कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील प्रकाश नगर येथील प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला व विविध विषयावर चर्चा केली.

## दयानंद कला महाविद्यालयाच्या ॲनिमेशन विभागाची मुंबईतील असेम्ब्लाज एंटरटेनमेंट स्टुडिओला शैक्षणिक सहल

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील ॲनिमेशन विभागाची शैक्षणिक सहल मुंबई येथील असेम्ब्लाज एंटरटेनमेंट स्टुडिओ येथे आयोजित करण्यात आली. या सहलीत ॲनिमेशन विभागातील २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना ॲनिमेशन व व्हीएफएक्स प्रोडक्शन प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली. स्टुडिओमधील विविध विभागांची ओळख करून देत प्रत्यक्ष प्रोडक्शन पाईपलाईन समजावून सांगण्यात आली. यावेळी कंपनीचे सीईओ श्री. अर्जुन माधवन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांची ओळख करून घेतली.



प्रोडक्शन हेड श्री. स्वप्निल कोटकर यांनी विद्यार्थ्यांना जिद्दीने काम करण्याचा सल्ला देत, ''कोणीही जन्मतः क्रिएटिव्ह नसतो, स्वतःला क्रिएटिव्ह बनवावे लागते'' असे मार्गदर्शन केले.

तसेच ॲनिमेशन डिरेक्टर श्री. चेतन तहसीलदार व को-हेड श्री. विधीत कुंद्रा यांनी कंपनीने केलेल्या कामांचे व्हिडिओ, ब्रेकडाऊन इमेजेसच्या माध्यमातून सादरीकरण केले. यामध्ये नुकताच प्रदर्शित होऊन बॉक्स ऑफिस रेकॉर्ड तोडणारा 'छावा' सिनेमा तसेच नेटफ्लिक्सवरील 'वूल्फ किंग' वेब सिरीज यांचा समावेश होता.

ही शैक्षणिक भेट यशस्वी होण्यासाठी प्रसिद्ध ॲनिमेटर श्री. सतीश थोकाडे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच राहुल, विश्वजीत व स्नेहा यांनी व्यवस्थापनासाठी मोलाची मदत केली.

यावेळी विशेष आनंदाची बाब म्हणजे ॲनिमेशन विभागाच्या २०१४ च्या बॅचमधील विद्यार्थी श्री. महेश राऊत यांची स्टुडिओमध्ये अचानक भेट झाली. त्यांनी नुकतीच ही कंपनी जॉइन केली असून, त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या अनुभवांविषयी माहिती दिली व मार्गदर्शन केले.या सहलीसाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमनजी लाहोटी, सचिव श्री. रमेशजी बियाणी तसेच दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

या सहलीदरम्यान ॲनिमेशन विभाग प्रमुख डॉ. दुर्गा शर्मा, प्रा. इरफान शेख व प्रा. पूजा खोंडे विद्यार्थीसोबत उपस्थित होते.

## पालिकांमधील बिनविरोध निकालांविरोधात मनसे हायकोर्टात; राज्य निवडणूक आयुक्तांकडेही निषेध व्यक्त

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यातील महापालिका निवडणुकीत ६७ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचा मुद्दा चांगलाच गाजतोय. याविरोधात आता विरोधकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावलेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे बिनविरोध नगरसेवकांविरोधात हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आलीय. केवळ राजकीय दबाव आणून, दमदाटी करून आणि पैसे वाटप करून विरोधकांना उमेदवारी मागे घ्यायला लावल्याचा आरोप मनसेकडून या याचिकेत करण्यात आलाय. याप्रकरणी मनसे नेत्यांनी राज्य निवडणूक आयोगालाही निषेध पत्र सादर केलंय.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात जीटीटी कंपनीतर्फे १५ दिवसीय कौशल्य कार्यशाळा




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या करिअर मार्गदर्शन व रोजगार संधी विभागातर्फे बी.कॉम., बीबीए व बीसीए तृतीय वर्ष तसेच एमबीए व एमसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी जीटीटी (ग्लोबल टॅलेंट ट्रॅक) कंपनीच्या माध्यमातून १५ दिवसीय कौशल्यविकास कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत ९० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध कृती, कौशल्यविकास सत्रे तसेच नोकरी मुलाखतींचा सराव घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, माहिती तंत्रज्ञान व तांत्रिक कौशल्ये, इंग्रजी भाषा प्रशिक्षण तसेच रोजगारासाठी आवश्यक तयारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी जीटीटी कंपनीचे विनय काळे, विनोद गवंडे, शिरीष टेमगिरे, अमोल आहेर, सिद्धांराम कोळी व अक्षय भालेराव यांनी तज्ज्ञ मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, रोजगार संधी विभाग प्रमुख प्रा. दगडू शेख यांच्यासह प्रा. प्रसाद पाटील, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. गीतांजली जोशी, प्रा. शैलजा चिकटे, प्रा. नम्रता वाघमारे, डॉ. कल्याणी औसेकर व प्रा. सुहाना शेख आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगजगताची ओळख करून देत आवश्यक कौशल्यांची तयारी करून घेण्यात येत असून, भविष्यातील रोजगाराच्या दृष्टीने ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२५ मध्ये आयओसीएल पाकणी साइडिंगमधून २४३ रॅक पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक करून ₹३४.७१ कोटींची भरीव मालवाहतूक वाढ नोंदवली

**सोलापूर/प्रतिनिधीः** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२५ या वर्षात सोलापूर जिल्ह्यातील आयओसीएल पाकणी साइडिंगमध्ये पेट्रोलियम उत्पादनांच्या वाहतुकीत सातत्यपूर्ण आणि भरीव वाढ नोंदवून मालवाहतूक क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.




२०२५ मधील मालवाहतुक कामगिरी

आयओसीएल पाकणी साइडिंगमध्ये पेट्रोलियम, तेल आणि वंगण (पीओएल) उत्पादनांच्या वाहतुकीची पहिलीवहिली कार्यवाही २८ जानेवारी २०२५ रोजी हाती घेण्यात आली, जी भारतीय रेल्वे आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) साठी एक ऐतिहासिक घटना ठरली. कामकाजाच्या सुरुवातीपासून, या वर्षातील कामगिरी अत्यंत उत्तम राहिली आहे.

- डिसेंबर २०२५ पर्यंत २४३ रॅक यशस्वीरित्या भरण्यात आले.
- सोलापूर विभागासाठी ₹३४.७१ कोटींचा मालवाहतूक महसूल प्राप्त झाला.

प्रमुख गंतव्यस्थाने

पाकणी येथून सेवा दिली जाणारी प्रमुख गंतव्यस्थाने खालीलप्रमाणे आहेत:

- मिरज, महाराष्ट्र
- हिरेनंदुरू, कलबुरगि जिल्हा, कर्नाटक
- हुबळी, कर्नाटक
- सिकंदराबाद, तेलंगणा

हे अनेक राज्यांमध्ये व्यापक प्रादेशिक कनेक्टिव्हिटी दर्शवते.

वाहतूक केलेली उत्पादने

पाकणी साइडिंगमधून विविध प्रकारच्या पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक केली जाते, जसे की

हाय स्पीड डिझेल (एचएसडी)
- मोटर स्पिरिट (एमएस)
- सुपीरियर केरोसीन ऑइल (एसकेओ)
- इथेनॉल
- बायोडीझेल

उत्पादनांचे हे वैविध्यपूर्ण मिश्रण कार्यक्षम, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक रेल्वे मार्गाद्वारे पारंपारिक आणि पर्यायी इंधनाच्या वाहतुकीला मदत करते.

पाकणी साइडिंमध्ये झालेला अमुलाग्र बदल

आयओसीएल पाकणी साइडिंग हे एक सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून उदयास आले आहे. ही महाराष्ट्रातील पहिली आयओसीएल रॅक-लोडिंग सुविधा, भारतातील आयओसीएलचे नववे विशेष विपणन रॅक-लोडिंग ठिकाण आणि देशभरातील रिफायनरीसह एकूण १८वे ठिकाण बनले आहे.

मूळतः १९९६ मध्ये अधिसूचित केलेल्या आयओसीएल पाकणी साइडिंगमधून पूर्वी मर्यादित प्रमाणात पेट्रोलियम उत्पादनांची आवक-जावक होत असे. २०२५ मध्ये बाह्य मालवाहतूक कार्यान्वित झाल्यामुळे, ही साइडिंग आता मोठ्या प्रमाणावर पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक हाताळत आहे, ज्यामुळे ती या प्रदेशासाठी एक प्रमुख मालवाहतूक केंद्र बनली आहे.

या महत्त्वाच्या मालवाहतूक उपक्रमाला कोयाली (वडोदरा) ते पाकणी (सोलापूर) पर्यंतच्या ७४७ किलोमीटर लांबीच्या समर्पित पाइपलाइनद्वारे पाठिंबा मिळत आहे. पेट्रोलियम उत्पादने कोयाली रिफायनरीतून पाकणी डेपोपर्यंत पाइपलाइनद्वारे अखंडपणे पोहोचवली जातात आणि त्यानंतर रेल्वे रेकद्वारे जवळच्या डेपो आणि उपभोग केंद्रांपर्यंत वितरित केली जातात, ज्यामुळे सुरक्षितता, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता सुनिश्चित होते.

आयओसीएल पाकणी साइडिंगवर पेट्रोलियम उत्पादनांच्या लोडिंगमधील प्रभावी कामगिरी ही भारतीय रेल्वे आणि आयओसीएल यांच्यातील प्रभावी समन्वयाचा पुरावा आहे. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग मालवाहतूक क्षमता वाढवण्यासाठी, महसूल वाढवण्यासाठी आणि महाराष्ट्र, शेजारील राज्ये व संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आई वडील म्हणजे ज्याने स्वतःला विसरून आपल्याला घडविले ते दैवत



**रामेश्वर डोंगरे, धाराशिव**

आई वडील म्हणजे आपल्या आयुष्याचे पहिले शिल्पकार! आपली ओळख, आपले संस्कार, आपले स्वप्न आणि आपले भविष्य या सगळ्याच्या पायाशी आई-वडिलांची निस्वार्थ तपश्चर्या तेच खरे दैवत! मात्र दैनंदिन धावपळीत आधुनिक जीवनशैलीत आणि स्वतःच्या यशाच्या धुंदीत आपण अनेकदा या ऋणाची जाणीवच विसरून जाते. आई वडील आपल्या आनंदासाठी स्वतःच्या इच्छा, हौशी स्वप्ने बाजूला ठेवतात. मुलाच्या शिक्षणासाठी रात्रंन-दिवस कष्ट करतात. स्वतः जुने कपडे घालतात, पण लेकरांना नवीन कपडे देतात. मुलाचे भविष्य उज्वल व्हावे म्हणून स्वतःचे आरोग्य आराम आणि आनंद याचीही तडजोड करतात. त्याच्या डोळ्यात स्वतःसाठी स्वप्न नसतात तर फक्त आपल्या मुलाचे यशस्वी आयुष्य दिसत असते. आजच्या पिढीला स्वातंत्र्य, पैसा आणि आधुनिकतेची आकर्षण जास्त भरुळे घालते आम्ही मोठे झालो आत्ता आम्हाला सगळे कळते या भावनेने अनेकदा आई-वडिलांचे सल्ला व अनुभव सुद्धा मुले विसरतात. त्यांच्या अपेक्षणा जुनाट ठरवले जाते, पण हेच आई-वडील आपल्यासाठी प्रत्येक संकटाशी लढलेले असतात प्रत्येक अडचणीत ढाल बनवून उभे राहिलेले असतात. खरंतर आयुष्यात यशस्वी होणे म्हणजे फक्त मोठे पद पैसा किंवा प्रसिद्धी मिळवणे नाही तर ज्यांनी आपल्याला घडवलं, त्या आई-वडिलांना सन्मान, प्रेम आणि आधार देणे हेच खरे यश आहे. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान त्यांच्या डोळ्यातला आनंद हे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा असतो. आई-वडील हे देवासारखेच असतात कारण देव आपल्याला आयुष्य देतो तर आई वडील त्या आयुष्याचा अर्थ देतात, म्हणूनच आज वेळ असताना त्यांच्याशी प्रेमाने बोला. त्यांचा सन्मान करा, त्यांना समजून घ्या. कारण आई-वडील असताना मिळणारा आधार माया आणि आशीर्वाद हे पुन्हा कधी परत मिळत नाहीत, आई वडिलांचे ऋण कधीच पूर्ण फेडता येत नाही पण प्रेम आदर आणि कृतज्ञ देण्यात ते हलके नक्कीच करता येतील

# जिल्हा परिषद सांजा गटाची जागा आर. पी.आय (सचिन खरात गट) साठी सोडण्यात येईल!-प्रतापसिंहजी पाटील



धाराशिव (प्रतिनिधी)-रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट)चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांनी आज दि ०४/०१/२०२६ रो.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)धाराशिव जिल्हाध्यक्ष मा.प्रतापसिंहजी पाटील यांची भेट घेतली. या भेटीत येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि आर. पी.आय (सचिन खरात)मधील समन्वय राखण्यावर विशेष भर देण्यात आला.

राजाभाऊ राऊत हे आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते असून, मागील अनेक वर्षांपासून सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी अत्याचारग्रस्त, पीडित व वंचित समाजघटकांसाठी आंदोलन, मोर्चे, निषेध निवेदने, उपोषणे आणि शासन दरबारी न्याय मिळवण्याचे काम केले आहे. तसेच, शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक समावेशाच्या क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे, ज्यामुळे ते धाराशिवमधील सामाजिक न्यायाच्या प्रश्नांमध्ये महत्त्वाचे नेते मानले जातात. भेटीत प्रतापसिंहजी पाटील यांनी स्पष्ट आश्वासन दिले की, जिल्हा परिषद सांजा गटाची जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट)साठी सोडण्यात येईल. यावर राजाभाऊ राऊत यांनी समाधान व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)उमेदवाराच्या विजयासाठी पूर्ण क्षमतेने व निष्ठेने काम करण्याची हमी दिली. राजकीय विश्लेषकांच्या मते, धाराशिवमधील ही भेट आणि घोषणादेखील राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय (खरात)मधील आगामी निवडणुकांसाठी ऐक्य, समन्वय आणि सामाजिक न्यायाच्या भूमिकेच्या दृढतेसाठी महत्त्वाची ठरेल. आर.पी.आय (खरात)ची आघाडी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी कायम राहील.

यावेळी भेटीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (श.प)धाराशिव जिल्हाध्यक्ष प्रतापसिंहजी पाटील आर.पी.आय (सचिन खरात गट) चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत,अरुणकुमार माने,राष्ट्रवादी काँग्रेस (अ.सं.)विभागाचे राज्य सचिव शरीफ शेख उपस्थित होते.

# ख्यातनाम गायक चंद्रकांत शिंदे यांचे धाराशिव जिल्ह्यात उत्स्फूर्त स्वागत!



धाराशिव,(प्रतिनिधी) -महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'जागर संविधानाचा' हा सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक स्व. विठ्ठल शिंदे यांचे नातू व प्रसिद्ध लोकगायक प्रल्हाद शिंदे यांचे सुपुत्र गायक चंद्रकांत प्रल्हाद शिंदे यांचा धाराशिव शहरात विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने धाराशिव शहरात आगमन होताच गायक चंद्रकांत शिंदे यांचे पत्रकार भाऊसाहेब अणदूरकर व बाळासाहेब अणदूरकर बंधू यांच्या वतीने पुष्पगुच्छ व शाल देऊन कौटुंबिक सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गायक चंद्रकांत शिंदे यांनी आपले आजोबा स्व. विठ्ठल शिंदे व वडील स्व. प्रल्हाद शिंदे यांच्या गायन कलेचा वारसा पुढे चालवत असल्याचा अभिमान व्यक्त केला. तसेच भाऊ आनंद शिंदे व मिलिंद शिंदे यांच्यासह संपूर्ण शिंदे परिवार लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी त्यांनी आपल्या आजोबा व वडिलांच्या आठवणींना उजाळा देत लोकसंगीत, शाहिरी व भीमगीत परंपरेचे महत्व विषद केले. संविधान मूल्यांचा प्रचार, सामाजिक समता व बंधुतेचा संदेश देणे हेच आपल्या गायनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

गायक चंद्रकांत शिंदे हे पुढील कार्यक्रमासाठी तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थी बुद्ध विहार तसेच नळदुर्ग येथे आयोजित बैठकीसाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळताच अणदुर व नळदुर्ग येथील पत्रकार बांधवांनी तसेच मैलारपूर श्री खंडोबा यात्रा देवस्थान कमिटीच्या वतीनेही त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमामुळे धाराशिव जिल्ह्यातील सांस्कृतिक व सामाजिक वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, 'जागर संविधानाचा' उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)-ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत गणेश गोरख पवार, वय २५ वर्षे, रा. उपळा मा. ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ६५,००० किंमतीची मोटरसायकल रोजी यांचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गणेश पवार यांनी दि.०२.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# सार्वजनिक व खाजगी आस्थापनांसाठी ईआर-१ माहिती देणे बंधनकारक

धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यातील सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांनी डिसेंबर २०२५ अखेर संपणाऱ्या तिमाहीसाठीची मनुष्यबळाची सांख्यिकी माहिती विहीत नमुना ईआर-१ मध्ये ऑनलाईन पद्धतीने सादर करणे बंधनकारक असल्याचे जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त श्री.संजय गुरव यांनी कळविले आहे.

ही माहिती सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे) कायदा १९५९ व नियम १९६० मधील कलम ५(१) व ५(२) अन्वये नियमितपणे सादर करणे आवश्यक असून,प्रत्येक आस्थापनाने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांची स्त्री-पुरुष व एकूण अशी सांख्यिकी माहिती नमुना ईआर-१ मध्ये भरून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभागाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन सादर करावी. माहिती सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जानेवारी २०२६ असून,विहीत मुदतीत शंभर टक्के प्रतिसाद मिळणे अत्यंत आवश्यक आहे.तसेच प्रत्येक आस्थापनाने आपली नोंदणी तपशीलही अद्यावत करावेत,असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

यासाठी सर्व आस्थापनांना यापूर्वीच युजरनेम व पासवर्ड देण्यात आले असून, त्याचा वापर करून संकेतस्थळावर लॉगिन करून अचूक माहिती भरावी.काही अडचण अथवा माहिती हवी असल्यास जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३४ वर किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व संबंधित आस्थापनांनी कायद्याचे पालन करून वेळेत माहिती सादर करावी व प्रशासनास सहकार्य करावे,असेही सहायक आयुक्त श्री.संजय गुरव यांनी नमूद केले आहे.


**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५**
**कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर**

ई-मेल- ee_ghelid1@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक ०२४०-२४५२१०१

**ई-निविदा सुचना क्र.२३ सन २०२५-२०२६**

मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेवावत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये कांही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रूपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना भाग २. टप्पा क्र.३ सावरगाव ता. तुळजापूर जि.धाराशिव येथील पंपगृह इमारतीतील विद्युतीकरण, वायरिंग व प्रकाश योजना करण्याचे काम. | धाराशिव | रू. १५,६६,३१२/- |
| २ | कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना भाग २, टप्पा क्र. ५ सिंदफळ ता. तुळजापूर जि.धाराशिव येथील पंपगृह इमारतीतील विद्युतीकरण, वायरिंग व प्रकाश योजना करण्याचे काम. | धाराशिव | रू. १५,७७,६०४/- |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक १२/०१/२०२६ ते दिनांक १९/०१/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २१/०१/२०२६ |

जा.क्र. गोजविवउसिवि/लेशा/९/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
छत्रपती संभाजीनगर
**दिनांक :- १/०१/२०२६**

स्वाक्षरीत/-
(वि. भा. वाघमारे)
कार्यकारी अभियंता,
गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
छत्रपती संभाजीनगर

जिमाका/एके/जाहि /११३/२०२५-२६


# राज्यस्तरीय स्क्वॅश स्पर्धेत चिखली गावच्या शिरपेच्यात मानाचा तुरा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथे मुलांची व मुलींची राज्यस्तरीय स्क्वॅश स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धेमध्ये १४ वर्ष वयोगटातुन मुलांमध्ये मौजे चिखली तालुका धाराशिव येथील विध्यार्थी कु. प्रेम विष्णू नरवडे याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला असून गोल्ड मेडल मिळविले.

या स्पर्धेमध्ये खेळाडू अतिशय उत्कृष्ट असे खेळले. नरवडे याने या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अशी कामगिरी करून धाराशिव जिल्ह्याची मान उंचावली आहे.

विजेता खेळाडूंचे भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रीती कदम यांच्या वतीने सत्कार करून त्याचा सन्मान करण्यात आला. तसेच पुढील राष्ट्रीय खेळासाठी व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

त्याच्या यशाबद्दल चिखली गावातील नागरिक तसेच महाविद्यालयातील शिक्षक मुख्याध्यापक यांनी त्याच्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापूनसमर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649